नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २४६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. २० ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का

### कळंबचे ठाकरे गटाचे ९ नगरसेवक भाजपमध्ये जाणार, काँग्रेसचाही एक नगरसेवक कमळ हाती घेणार



**धाराशिव (स. गांवकरी)**

राज्याच्या राजकारणात पक्षांतराच्या घडामोडींना पुन्हा वेग आला असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आणखी एक मोठा राजकीय धक्का बसण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील कळंब नगरपरिषदेतील ठाकरे गटाचे तब्बल ९ नगरसेवक आणि काँग्रेसचा १ नगरसेवक असे एकूण १० नगरसेवक आज भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती समोर आली आहे. सोलापूर येथे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश होणार असल्याचे सांगितले जात आहे. या पक्षप्रवेशामुळे कळंब नगरपरिषदेतील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होणार असून भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीचे संख्याबळ वाढणार आहे. विशेष म्हणजे ठाकरे गटाचे सर्वच्या सर्व ९ नगरसेवक पक्ष सोडणार असल्याने हा उद्धव ठाकरे यांच्या पक्षासाठी स्थानिक पातळीवरील मोठा धक्का मानला जात आहे. कळंब नगरपरिषदेत सध्या शिवसेना शिंदे गटाचे ४, भाजपचे ६, शिवसेना ठाकरे गटाचे ९ आणि काँग्रेसचा १ नगरसेवक असे संख्याबळ आहे. मात्र, ठाकरे गटाचे ९ आणि काँग्रेसचा १ नगरसेवक भाजपमध्ये गेल्यास नगरपरिषदेतील सत्तेचे गणित पूर्णपणे बदलणार आहे. ठाकरे गटाच्या ९ नगरसेवकांपैकी ८ नगरसेवक निवडून आलेले असून एका स्वीकृत नगरसेवकाचाही या पक्षप्रवेशात समावेश असल्याची माहिती आहे. गटनेत्यासह संपूर्ण गटच भाजपमध्ये जाणार असल्याने कळंबच्या राजकारणात या पक्षांतराचे मोठे परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे हे सर्व नगरसेवक शिवसेना शिंदे गटात न जाता थेट भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात भाजपचे वर्चस्व वाढण्याची शक्यता आहे. या संभाव्य पक्षांतराची कुणकुण काही दिवसांपासूनच राजकीय वर्तुळात सुरू होती. धाराशिवमधील ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर जिल्ह्यातील ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी आणि लोकप्रतिनिधींशी संपर्क वाढवल्याची चर्चा होती. कळंबमधील काही नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांची भेट घेतल्याचेही समोर आले होते. त्यामुळे हे नगरसेवक पक्षांतर करणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी बुधवारी मुंबईतील मातोश्री निवासस्थानी धाराशिव जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची बैठक बोलावली होती. आमदार कैलास पाटील यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना या बैठकीसाठी बोलावण्यात आले होते. मात्र, कळंबमधील ठाकरे गटाच्या नगरसेवकांनी या बैठकीकडे पाठ फिरवली. मातोश्रीवरील बैठकीला हे नगरसेवक उपस्थित न राहिल्याने त्यांच्या पक्षांतराच्या चर्चांना आणखी बळ मिळाले. त्यानंतर आता या सर्व नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

#### कैलास पाटील यांच्या मतदारसंघात ठाकरे गटाला धक्का

कळंब हा शिवसेना ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांच्या मतदारसंघाचा भाग आहे. त्यामुळे त्यांच्या मतदारसंघातील ठाकरे गटाचे नगरसेवक एकाचवेळी भाजपमध्ये जाणे हा कैलास पाटील यांच्यासाठीही मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या पक्षांतरानंतर धाराशिव जिल्ह्यात ठाकरे गटाची संघटनात्मक ताकद टिकवून ठेवण्याचे आव्हान उद्धव ठाकरे आणि स्थानिक नेतृत्वासमोर आहे. त्यातच आता कळंबमधील संपूर्ण नगरसेवकांचा गट भाजपमध्ये जाणार असल्याने या पक्षांतराचे पडसाद जिल्ह्याच्या राजकारणात उमटण्याची शक्यता आहे.

## गावांचा जलयुक्त शिवारमध्ये समावेश करणार

**मुंबई (स. गांवकरी)**



राज्यात मागील पाच वर्षांत टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागलेल्या टंचाईग्रस्त गावांचा जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्याने समावेश करून, या गावांमध्ये जलसंधारणाची कामे तातडीने हाती घ्यावीत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मृद व जलसंधारण व्यवस्थापनाबाबत बैठक झाली. यावेळी राज्यातील जलसंधारणाची कामे, जलस्रोतांचे बळकटीकरण तसेच विविध विभागांच्या समन्वयातून जलव्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन-नैनुटीया, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार,रोजगार हमी योजना विभागाचे सचिव अप्पासो धुळाज आदी उपस्थित होते. राज्यातील सूक्ष्म पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि जलस्रोतांचे बळकटीकरण याला प्राधान्य देणे आवश्यक आहे. ज्या प्रकल्पांची कामे निश्चित करण्यात आली आहेत, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल असे फडणवीस यांनी सांगितले. या कामांना प्राधान्याने गती देण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. त्यामुळे जलसंधारणाची कामे अधिक परिणामकारकपणे आणि थेट पद्धतीने पूर्ण करता येतील असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मागील पाच वर्षांत ज्या गावांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला, अशा गावांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांना जलयुक्त शिवार अभियान ३.० मध्ये प्राधान्य द्यावे. या गावांमध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थिती आणि पाण्याची गरज लक्षात घेऊन जलसंधारणाची कामे निश्चित करावीत. जलस्रोतांच्या बळकटीकरणामुळे निर्माण झालेला सकारात्मक परिणाम नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी जलसंधारणाशी संबंधित यशकथा तयार करून त्यांचा प्रभावी प्रसार करावा, अशा सूचनाही फडणवीस यांनी दिल्या.

## थोडक्यात...




### गावठी कट्टा बाळगणाऱ्या आरोपीने घेतला गळफास

बीड (स. गांवकरी) : शहरात गावठी कट्टा व जिवंत काडतूस बाळगल्याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने अटक केलेल्या आणि खो-खो चा राष्ट्रीय खेळाडू असलेल्या तुकाराम गंगाधर करांडे (वय 28 रा. खडकी देवळा, ता. वडवणी, सध्या रा. स्वराज्यनगर, बीड) याने बुधवार (दि.19) पुणे येथे गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्याच्या आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून विविध चर्चांना उधाण आले आहे. पंधरा दिवसांपूर्वी बीड शहरातील हॉटेल यशोदा परिसरात पिस्टल घेऊन एक तरुण फिरत असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. पथकाने कारवाई करत करांडे याच्याकडून एक गावठी कट्टा आणि एक जिवंत काडतूस असा सुमारे 40 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. अटकेनंतर त्याला पुढील कारवाईसाठी शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले होते. त्यानंतर त्याची दोन दिवसांत जामिनावर सुटका झाली होती. दरम्यान, जामिनानंतर त्याच्याविरुद्ध पोक्सो कायद्यान्वयेही गुन्हा दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे.

### जमीन वाटपासाठी सुधारित धोरण

मुंबई (स. गांवकरी) : राज्यात गाजलेल्या 'आदर्श' गृहनिर्माण संस्था भूखंड वाटप घोटाळ्यानंतर सरकारी भूखंड वाटपावर घालण्यात आलेली बंदी अखेर राज्य सरकारने उठविली असून सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमीन वाटप करण्यासंदर्भातील सुधारित धोरण जाहीर केले आहे. राज्यात ऑक्टोबर- नोव्हेंबर २०१० मध्ये 'आदर्श' गृहनिर्माण सोसायटी घोटाळा उघडीस आला होता. या घोटाळ्यात तत्कालीन मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांना राजीनामा द्यावा लागला होता. तर काही सनदी अधिकाऱ्यांवरही निलंबनाची कारवाई झाली होती. या घोटाळ्यानंतर राज्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमीन वाटप करण्यास बंदी घालण्यात आली होती. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या आदेशानुसार सरकारने भूखंड वाटपाच्या धोरणात आमुलाग्र बदल करीत सन २०१० पासून बंद पडलेली शासकीय भूखंड वाटपाची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतलेल्या निर्णयामुळे राज्यातील हजारो शासकीय कर्मचारी, पत्रकार, कलाकार, मागासवर्गीय आणि सर्वसामान्य नागरिकांना हक्काच्या घरासाठी शासकीय भूखंड मिळण्याचा मार्ग आता सुकर होणार आहे.

### एमएमआरडीएतील भरतीला स्थगिती

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील (एमएमआरडीए) सहाय्यक अभियंता पदासाठी राबवण्यात आलेल्या भरती प्रकियेत गैरप्रकार झाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत एमएमआरडीएने भरती प्रक्रियेची चौकशी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी राज्याचे माजी मुख्य सचिव जॉनी जोसेफ यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून चौकशी पूर्ण होईपर्यंत भरती प्रक्रिया थांबवण्यात आली आहे.

## तुषार गांधी यांनी घेतली अभिजीत दीपके यांची भेट

**वाळूज महानगर: (स. गांवकरी)**



महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी यांनी बुधवारी (दि. १९) सीजेपीचे संस्थापक अभिजीत दीपके यांच्या सिडको वाळूज महानगर-१ येथील निवासस्थानी भेट घेतली. यावेळी महात्मा गांधी मिशनचे फिरोज मिथीबोरवाला, इंद्रजित मोहिते, जॉन आदी उपस्थित होते. प्रसारमाध्यमांशी बोलताना तुषार गांधी म्हणाले, "इच्छा असूनही जंतर-मंतरवरील आंदोलनात सहभागी होता आले नाही. मात्र, ज्या पद्धतीने हे आंदोलन झाले, ते माझ्यासाठी एक प्रकारचा सत्याग्रह आहे. देशाची युवा पिढी कधी जागृत होईल, याची मला नेहमीच प्रतीक्षा होती. माझ्या हयातीत हे घडले, याचा मला आनंद आहे. आता मी निवृत्त होऊ शकतो, असे प्रथमच आनंदाने वाटते." सीजेपी आंदोलनाचा सर्वांत मोठा विजय हा शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा नसून, देशातील तरुण सरकारला प्रश्न विचारत आहेत, हा आहे. सीजेपीचे आंदोलन आता राष्ट्रीय आंदोलन बनले असून, ते कोणीही थांबवू शकत नाही. हक्कांच्या या लढ्यात आम्ही समर्थकाची भूमिका बजावू, असे सांगत त्यांनी सीजेपीच्या 'शाळा दुरुस्त करा' मोहिमेचे कौतुक केले. अभिजीत दीपके म्हणाले, "महात्मा गांधी हे राष्ट्राचा आत्मा आहेत. सीजेपीचे शांततापूर्ण व अहिंसक आंदोलन गांधींनी दाखवलेल्या मार्गावर आधारित आहे.

## शालेय अभ्यासक्रमात अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांचा 'धडा'

#### देवेंद्र फडणवीस यांचे आदेश

**मुंबई : (स. गांवकरी)**



तरुण पिढी नशेच्या आहारी गेल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा त्यांना नशेच्या दुष्टचक्रात ढकलणाऱ्या प्रवृत्तींना सुरुवातीलाच प्रतिबंध करणे आवश्यक आहे. राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालय परिसर टपरी मुक्त झाला पाहिजे. शालेय अभ्यासक्रमातून अंमली पदार्थांचे दुष्परिणामांच्या 'धडा' समावेश करा, असे निर्देश निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी 'नशामुक्त महाराष्ट्र धोरणा'चे सादरीकरण करण्यात आले. नशामुक्त महाराष्ट्रासाठी शासकीय यंत्रणेचा समन्वित दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. प्रत्येक विभागाने आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडल्यास राज्याला नशामुक्त करण्याचे उद्दिष्ट साध्य करता येईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. नशेच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांना त्यातून बाहेर काढण्यासाठी राज्यातील प्रत्येक शासकीय रुग्णालयात नशामुक्ती केंद्र स्थापन करण्यात यावा. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतही नशामुक्ती केंद्रे कार्यान्वित करावीत. केंद्र शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या केंद्रांचे सक्षमीकरण करावे, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. नशामुक्तीनंतर तरुण पुन्हा व्यसनाकडे वळू नयेत, यासाठी केवळ पुनर्वसन केंद्रे उभारून चालणार नाही. व्यसनाला कारणीभूत ठरणाऱ्या घटकांवरही नियंत्रण आणणे गरजेचे आहे. त्यासाठी या केंद्रांच्या कामकाजासाठी स्वतंत्र कार्यप्रणाली विकसित करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयाचा परिसर टपरीमुक्त असावा. याबाबत कोणतीही तडजोड करू नये. सर्व शैक्षणिक संस्थांचे परिसर अमली पदार्थमुक्त करण्यासाठी प्राचार्य आणि मुख्याध्यापकांनी त्याबाबतची घोषणा करावी. शालेय अभ्यासक्रमात अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत प्रभावी माहितीचा समावेश करण्याची कार्यवाही सुरु करण्यात यावी असे त्यांनी सांगितले.

राज्यात अमली पदार्थविरोधी कारवाईला वेग आल्याचे आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. २०२३ मध्ये एनडीपीएस कायद्यांतर्गत ८९७ कोटी रुपये किमतीचे ४३ हजार ६३२ किलो अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. २०२५ मध्ये जप्तीचे प्रमाण ५६ हजार २०६ किलोवर पोहोचले आहे. त्याची किंमत सुमारे एक हजार ३४० कोटी रुपये आहे. २०२३च्या तुलनेत जप्तीच्या प्रमाणात २९ टक्के, तर किमतीच्या दृष्टीने ४९ टक्के वाढ झाली आहे. बैठकीला गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, माहिती व जनसंपर्क विभागाचे महासंचालक ब्रिजेश सिंह उपस्थित होते.

## सासूने सुनेचा काटा काढला, तीन लाखांची सुपारी

#### मुंबईतील मर्डर मिस्ट्रिचा धक्कादायक उलगडा

**मुंबई : (स. गांवकरी)**




मुंबईतील घाटकोपरमध्ये झालेल्या एका ३५ वर्षीय महिलेच्या मृत्यू प्रकरणातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. घरात घरकाम करायला येणाऱ्या मदतनीस आणि महिलेच्या सासूकडून रचलेलं षडयंत्र यानिमित्ताने उघडे पडले आहे. या प्रकरणी चौघांना पोलिसांनी अटक केली आहे. मंगळवारी अटक करण्यात आलेल्या ६५ वर्षीय सासू धनलक्ष्मी घानजी यांनी सुरुवातीला सपना घानजी यांचा मृत्यू बाथरुममध्ये पाय घसरून पडल्यामुळे झाल्याचा बनाव रचला होता. मात्र, मृतदेहावरील जखमांचे स्वरूप, सीसीटीव्ही फुटेज आणि कॉल रेकॉर्ड्सच्या आधारे पोलिसांनी या गुन्ह्याचा छडा लावला. बुधवारी पोलिसांनी घरगुती कामगार महिला मंगला जाधव, तिचा पती सुरेश, मुलगी शिवानी (२१) आणि मुलगा साजन (१९) यांना अटक केली. पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री सपना यांचा मृतदेह बाथरुममध्ये आढळून आला, ज्यावर जखमांच्या खुणा होत्या. त्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून सासूला अटक केली. चौकशीदरम्यान आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे सासूनेच सुनेच्या हत्येसाठी इतर चौघांना सुपारी दिल्याचे समोर आले. सपना दारूच्या नशेत असताना बाथरुममध्ये पडल्याचा बनाव सासूने रचला होता. सपना यांनी पूर्वी सासरच्या लोकांविरुद्ध एफआयआर दाखल केला होता, तसेच सपना यांचे विवाहबाह्य संबंध असून त्यांना दारूचे व्यसन असल्याचा सासूला संशय होता. या कारणांमुळे धनलक्ष्मी सुनेवर प्रचंड नाराज होत्या. सपना या वर्षाच्या सुरुवातीला पती आणि मुलासोबत दुबईला गेल्या होत्या. जून महिन्यात त्या मुलासह सुट्ट्यांसाठी भारतात परतल्या, तर त्यांचे पती दुबईतच कामाला होते. भारतात परतल्यापासून सासू-सुनेमध्ये सतत भांडणे होत असत. याशिवाय, २०२४ मध्ये सपना यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात सासरच्यांविरोधात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. सोमवारी रात्री सपना यांच्या पालकांना फोन आला की सपना बाथरुममध्ये पडल्या आहेत आणि सासरच्यांनी त्यांना रुग्णालयात नेले आहे. मात्र, रुग्णालयात डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घाटकोपरमधील पंतनगर पोलीस ठाण्याचे पथक रुग्णालयात पोहोचले तेव्हा त्यांना सपना यांच्या गळ्याभोवती काळे-निळे वळ आणि डोक्याच्या डाव्या बाजूने रक्तस्राव झाल्याचे दिसले, ज्यामुळे पोलिसांचा संशय बळावला. धनलक्ष्मी यांनी आधी सपना बाथरुममध्ये घसरून पडल्याचे सांगितले. नंतर चौकशीत त्यांनी सांगितले की, भांडणादरम्यान त्यांनी सपना यांना धक्का दिला, ज्यामुळे डोक्याला दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. परंतु, जखमांचे स्वरूप पाहता सपना यांचे डोके एखाद्या कठीण वस्तूवर आदळण्यात आल्याचे स्पष्ट झाले. सपना यांच्या वडिलांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करत पोलिसांनी धनलक्ष्मी यांना अटक केली. धनलक्ष्मी यांनी सपना यांच्याकडेच कामाला असलेल्या मंगला जाधव या कामगार महिलेला हत्येच्या कटात सामील केले आणि तिला ३ लाख रुपये देण्याचे कबूल केले. या कामात मंगलाचा पती, मुलगा आणि मुलगी देखील सामील झाले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी धनलक्ष्मी भांडण मिटवण्याच्या बहाण्याने सपना यांच्या घरी गेल्या. त्यानंतर त्यांनी मंगला आणि तिच्या कुटुंबातील तिघांना घरात घेतले. सपना दारूच्या नशेत असताना आरोपींनी त्यांच्या डोळ्यात मिरची पूड फेकली, डोक्यावर काचेच्या ग्लासने प्रहार केला आणि ओढणीने गळा आवळला.

## मासेमारी बंदी काळात गरजू मच्छीमारांना २० हजारांची मदत

**मुंबई : (स. गांवकरी)**



पावसाळ्यात दोन अडीच महिन्याच्या मासेमारी बंदीच्या कालावधीत मच्छीमार कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी राज्य सरकार आंध्र प्रदेशाच्या धर्तीवर गरजू मच्छीमारांना प्रत्येकी २० हजार रुपये आर्थिक मदत देणार आहे. तसा प्रस्ताव मत्सविभागाने वित्त विभागाकडे पाठविला आहे. राज्यातील ८ हजार ८२९ मच्छीमार कुटुंबांना प्रत्येकी २० हजार रुपये दिले जाणार आहेत. त्यासाठी १७ कोटी ६५ लाख ४० हजार रुपये लागणार आहेत. विधासभा, पालिका निवडणूकीत महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची ही पूर्ती आहे. राज्यात दरवर्षी पावसाळी मासेमारी बंदीचा कालावधी १ जून ते ३१ जुलै असा असतो. तो यंदा पंधरा दिवसांनी वाढविण्यात आला. १५ ऑगस्टला हा कालावधी संपला. या काळात समुद्रात मासेमारी बंद असल्याने पारंपरिक मच्छीमारांच्या उत्पन्नाचा स्रोत बंद होतो. विद्यमान योजनेत पात्र मच्छीमारांना केंद्र व राज्य शासनाच्या हिस्स्यातून वार्षिक केवळ ४ हजार ५०० रुपयांचे अर्थसहाय्य दिले जाते. वाढती महागाई आणि अपुरी मदत असल्याने ही मदत वाढवून २० हजार रुपये करण्याचा प्रस्ताव आहे. या मदतीचा लाभ सरसकट सर्व मच्छीमारांना देण्याऐवजी खरोखर गरजू मच्छीमारांची निवड करण्यावर राज्य सरकारचा भर आहे. राज्य सरकारच्या लाडकी बहीण योजनेत अनेक अपात्र बहीणींना दोन वर्षे लाभ द्यावा लागला. यात सरकारचे खूप मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे या योजनेतील लाभार्थींची टाटा इन्सिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेस (टीस) कडून सर्वेक्षण केले जात आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सात किनारी जिल्ह्यांतील मच्छीमारांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. यामध्ये रायगड जिल्ह्यातील लाभार्थ्यांची संख्या सर्वाधिक आहे. त्यानंतर सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांचा क्रमांक लागतो.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपळवंडीत १० वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून हत्या

आळेफाटा, ता. जुन्नर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे मंगळवारी दि. १८ रोजी १० वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरात एकटी असलेली चिमुकली घरात नसल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी शोध सुरू केला. यावेळी गावातीलच २५ वर्षीय साहिल संपत खैरे याने चिमुकलीला उसाच्या शेतात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिची हत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. कुटुंबीयांच्या तक्रारीनंतर आळेफाटा पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. उसाच्या शेतातून चिमुकलीचा मृतदेह ताब्यात घेऊन आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा पोक्सो कायद्यांतर्गत नोंदवण्यात आला आहे. या घटनेच्या निषेधार्थ बुधवार दि.१९ रोजी सकाळी १० वाजता ग्रामस्थांनी पुणे-नाशिक महामार्गावरील पिंपळवंडी स्टँड येथे रास्ता रोको केला. "चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे", "आरोपीला फाशी झालीच पाहिजे" अशा घोषणा देत ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त केला. घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल,अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्यासह पोलीस पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवले जाईल आणि आरोपीला कठोर शिक्षा केली जाईल, असे आश्वासन ग्रामस्थांना दिले. सध्या परिसरात तणावपूर्ण शांतता असून, आळेफाटा पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे.

### एमआयडीसी परिसरात दहशत; तीन सराईत गुन्हेगार वर्षभरासाठी हद्दपार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शहरातील तोफखाना आणि एमआयडीसी परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या टोळीतील तीन सराईत गुन्हेगारांना तब्बल एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. या टोळीविरुद्ध बेकायदेशीर जमाव जमवणे, घातक हत्यारे बाळगणे, मालमत्तेचे नुकसान करणे आणि खुनाचा प्रयत्न यांसारखे तब्बल आठ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सखोल चौकशीअंती आशिष ऊर्फ पप्पू अंतोन पाटोळे (२२, रा. नागापूर), अमोल गोरख आव्हाड (२४, रा. काकासाहेब म्हस्के रोड) आणि सुरज ऊर्फ खंडू अरविंद भिंगारदिवे (२२, रा. नागापूर) या तिघांविरोधात हद्दपारीची कारवाई करण्यात आली.

### चिमुकल्या स्वप्नांचा आक्रोश!

आळेफाटा (स. गांवकरी) : एका घरात मुलगी जन्माला येते, तेव्हा केवळ एक जीव जन्माला येत नाही; त्या घराच्या स्वप्नांना नवे पंख फुटतात. तिच्या बोबड्या बोलांनी घर आनंदाने भरते, तिच्या पहिल्या पावलांनी अंगण उत्सवमय होते आणि तिच्या डोळ्यांत आई-वडिलांना आपल्या उद्याचे सुंदर प्रतिबिंब दिसते. पण याच निरागस बालपणावर जेव्हा अत्याचाराची काळी सावली पडते, तेव्हा केवळ एका मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेचीही परीक्षा सुरू होते. अल्पवयीन मुलींवरील लैंगिक अत्याचार आणि त्यानंतर काही प्रकरणांत घडणाऱ्या हत्या ही केवळ गुन्हेगारी घटना नाही; ती आपल्या सामाजिक विवेकाला पडलेली भेग आहे. नसरापूरनंतर नुकतीच पिंपळवंडी (ता. जुन्नर) येथे समोर आलेली घटना मन सुन्न करणारी आहे. अशा घटना वारंवार घडत असतील, तर गुन्हेगारांच्या विकृत मानसिकतेसोबतच समाज म्हणून आपण कुठे कमी पडतो आहोत, याचाही विचार करण्याची वेळ आली आहे. ज्या वयात मुलीच्या हातात पुस्तक आणि शाळेची बॅग असावी, मैत्रिणींसोबत खेळण्याची स्वप्ने असावीत आणि भविष्यात काय व्हायचे याची निरागस कल्पना असावी, त्या वयात तिच्या वाट्याला भीती, अत्याचार आणि वेदना येत असतील, तर हा केवळ एका बालिकेचा पराभव नाही; हा आपल्या सभ्यतेचा पराभव आहे. बालकांना लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देण्यासाठी POCSO कायदा अस्तित्वात आहे.

## कायदा हातात घेणाऱ्यांची गय केली जाणार नाही : विनोद घुगे

अक्कलकोट : (स. गांवकरी)



अक्कलकोट दक्षिण पोलीस हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये शिस्त आणण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार आणि अल्पवयीन मुलांच्या हातात गाड्या देणाऱ्या पालकांवर आता थेट कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे. दक्षिण पोलीस निरीक्षक विनीद घुगे यांनी स्पष्ट शब्दांत तडाखा देत नागरिकांना शिस्तीचे धडे दिले आहेत.

अनेकादा अल्पवयीन मुले वाहने चालवताना दिसतात,ज्यामुळे जीवघेणे अपघात होऊन निष्पाप जीवांचे नुकसान होते आणि शेवटी पालकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.यावर आळा घालण्यासाठी अल्पवयीन मुले गाडी चालवताना आढळल्यास थेट पालकांवर कायदेशीर कारवाई केली जाईल.

आपसात कोणतेही वाद किंवा तंटे झाल्यास कायदा हातात न घेता नागरिकांनी थेट पोलीस ठाण्यात येऊन अधिकृत तक्रार नोंदवावी. कोणीही खोटे गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केल्यास तो खपवून घेतला जाणार नाही. मैंदर्गी, दुधनी, जेऊर, नागणसूर यासह संपूर्ण दक्षिण हद्दीतील गावागावांत जाऊन पोलिसांकडून विशेष बैठका घेतल्या जाणार आहेत. रस्त्यावर वाढलेली वाहनांची संख्या आणि शिस्तहीन वाहतुकीला आवर घालण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी सपोनि गणेश कड आणि गोपनीय विभागाचे गजानन शिंदे उपस्थित होते.अक्कलकोट तालुक्यात शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी प्रशासनाने उचललेल्या या कडक पावलांचे सुजाण नागरिकांकडून स्वागत होत आहे.

> "कायदा हातात घेणाऱ्यांना अजिबात सोडले जाणार नाही. जमिनीचे किंवा इतर कोणतेही वाद असल्यास नागरिकांनी स्वतः कायदा हातात न घेता न्यायालयीन मार्गाचा अवलंब करावा आणि पोलिसांना सहकार्य करावे."
>
> — विनीद घुगे, पोलीस निरीक्षक (दक्षिण पोलीस ठाणे, अक्कलकोट)

# भूमी अभिलेख कार्यालयाची हलगर्जी?

### सावेडीतील मूळ नकाशातील नाले सुधारित नकाशातून गायब : ४५ मीटर उंच इमारत वादात; उपअधीक्षक भिंगारदिवेंच्या चौकशीचे आदेश

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



सावेडीतील पत्रकार चौकात सारडा महाविद्यालयालगतच्या अंतिम भूखंड क्रमांक ४३-अच्या सुधारित मोजणी नकाशातून दोन्ही बाजूंचे नैसर्गिक नाले गायब झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते शाकीर शेख यांनी जमाबंदी आयुक्त तथा संचालक भूमी अभिलेख यांच्याकडे केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात आली असून, नगर भूमापन कार्यालयाचे उपअधीक्षक जितेंद्र भिंगारदिवे यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करून स्पष्ट निष्कर्षांसह अहवाल सादर करण्याचे आदेश भूमी अभिलेख उपसंचालक, नाशिक प्रदेश यांना देण्यात आले आहेत.

मौजे सावेडीच्या मूळ गाव नकाशामध्ये जुना सर्वे क्रमांक १६१मधील अंतिम भूखंड क्रमांक ४३-अच्या दोन्ही बाजूंनी नैसर्गिक नाले स्पष्टपणे दर्शविण्यात आले आहेत. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रारूप विकास आराखड्यासोबत प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'विद्यमान जमीन वापर नकाशात'देखील संबंधित परिसरातील नाले आणि नैसर्गिक जलप्रवाह दाखविण्यात आले आहेत. हा नकाशा अंतिम विकास आराखड्याचा नसून, प्रारूप विकास आराखड्याच्या प्रक्रियेत शहरातील विद्यमान जमीन वापर आणि भौगोलिक स्थिती दर्शविणारा नकाशा आहे. मात्र, नगर भूमापन कार्यालयाने अंतिम भूखंड क्रमांक ४३-असाठी तयार केलेल्या सुधारित मोजणी नकाशामध्ये भूखंडाच्या दोन्ही बाजूंच्या नैसर्गिक नाल्यांचा स्पष्ट उल्लेख अथवा सीमांकन करण्यात आलेले नाही. त्यामुळे मूळ गाव नकाशा आणि विद्यमान जमीन वापर नकाशात दिसणारे नाले सुधारित मोजणी नकाशातून नेमके कसे गायब झाले, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

संबंधित भूखंडावर सध्या सुमारे ४५ मीटर उंचीच्या विशेष इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सुधारित मोजणी नकाशामध्ये दोन्ही बाजूंच्या नाल्यांची नोंद न केल्यामुळे प्रत्येक नाल्यापासून नियमानुसार आवश्यक असलेले नऊ-नऊ मीटर अंतर न सोडताच बांधकाम परवानगी देण्यात आल्याचा गंभीर आरोप शेख यांनी तक्रारीत केला आहे. यापूर्वी प्रत्यक्ष जागेवरील नैसर्गिक नाला रुंद स्वरूपात वाहत होता. मात्र, इमारतीचे बांधकाम सुरू झाल्यानंतर संबंधित बांधकाम व्यावसायिकाने या नैसर्गिक नाल्याला अरुंद नालीचे स्वरूप देऊन त्याच्या बाजूने कॉंक्रीटची भिंत उभी केली असल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे नाल्याची मूळ रुंदी, नैसर्गिक हद्द आणि पाण्याचा प्रवाह गंभीररीत्या बाधित झाल्याचे शेख यांचे म्हणणे आहे. महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या सहायक संचालक स्नेहल यादव यांनी अंतिम भूखंड क्रमांक ४३-अची चतुःसीमा, पोटहिस्स्याचे मोजणीपत्रक, गाव नकाशा, खाडाखोडी उतारा तसेच प्रत्यक्ष जागेवरील नैसर्गिक नाल्याची अधिकृत नोंद मिळण्यासाठी नगर भूमापन कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार केला होता. उपलब्ध मोजणी नकाशात लगतच्या सीमा स्पष्ट नसल्याचे तसेच विद्यमान जमीन वापर नकाशामध्ये संबंधित भूखंडाच्या परिसरातून नैसर्गिक प्रवाह जात असल्याचेही त्यांनी लेखी पत्राद्वारे निदर्शनास आणून दिले होते. तरीही दोन्ही नाल्यांची स्पष्ट नोंद आणि सीमांकन असलेला अचूक सुधारित मोजणी नकाशा मुदतीत उपलब्ध करून देण्यात आला नाही. परिणामी, नाल्यांपासून आवश्यक नऊ-नऊ मीटर अंतर न सोडताच बांधकाम परवानगीची प्रक्रिया पुढे गेली आणि प्रत्यक्ष बांधकामही सुरू झाले, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

रुंद नैसर्गिक नाल्याला अरुंद नालीचे स्वरूप देऊन कॉंक्रीटची भिंत उभारल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

## अवैध मावा, गुटखा विक्रेत्यांवर स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

■ एकाच दिवशी ६ ठिकाणी छापे; १६ जणांवर गुन्हे दाखल, १.३७ लाखांचा मुद्देमाल जप्त

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध मावा, गुटखा, पानमसाला आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली आहे. दि. १५ ऑगस्ट रोजी नेवासा, सुपा आणि पारनेर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी सहा वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवाईत १६ जणांविरुद्ध सहा गुन्हे दाखल करण्यात आले असून, एकूण १ लाख ३७ हजार ५८० रुपयांचा मावा, पानमसाला व सुगंधित तंबाखूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांची माहिती संकलित करून त्यांच्यावर प्रभावी कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी चार पथके तयार करून जिल्ह्यातील अवैध गुटखा व सुगंधित तंबाखू विक्रेत्यांची माहिती घेऊन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. या पथकांनी पंचांसमक्ष नेवासा, सुपा आणि पारनेर परिसरात सहा ठिकाणी छापे टाकले. कारवाईदरम्यान नेवासा पोलीस ठाण्यात तीन, सुपा पोलीस ठाण्यात एक आणि पारनेर पोलीस ठाण्यात दोन अशा एकूण सहा गुन्ह्यांची नोंद करण्यात आली. कारवाईत नेवासा येथील तीन कारवायांमध्ये ९१ हजार २०० रुपये, सुपा येथील कारवाईत २३ हजार ७० रुपये आणि पारनेर येथील दोन कारवायांमध्ये २३ हजार ३१० रुपये, असा एकूण १ लाख ३७ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणांमध्ये काही आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून, काही आरोपी फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

## विषमते विरुद्धचा लढा आणि शिक्षणाची मशाल!

### "मी वस्ताद लहुजी साळवे बोलतोय" एकपात्री प्रयोगाचे यशस्वी आयोजन

पारनेर : (स. गांवकरी)



महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात बहुजन, दलित आणि शोषित घटकांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर, सावित्री फातेमा सद्भावना मंचच्या वतीने प्रा. कुमार आहेर( सर)यांच्या माध्यमातून प्रेरणास्थान, मुक्ता साळवे हिच्या जीवनकार्यावर आधारित एका अत्यंत महत्त्वपूर्ण 'एकपात्री प्रयोगाचे' आयोजन करण्यात आले. हा प्रयोग केवळ मनोरंजनाचा नसून, समता, बंधुता आणि न्यायाचे विचार घराघरांपर्यंत पोहोचवणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

इतिहासामध्ये मांग आणि महार समाजाला जो जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि अमानुष सामाजिक अन्याय सहन करावा लागला, त्याविरुद्ध निर्भिडपणे आवाज उठवणाऱ्या मोजक्या महान व्यक्तींमध्ये मुक्ता साळवे यांचे नाव अग्रक्रमाने येते. त्यांनी आपल्या अत्यंत प्रभावी लेखणीच्या माध्यमातून त्या काळातील प्रस्थापित विषमतेला आणि जातीव्यवस्थेला थेट आव्हान दिले. शिक्षणाचे दरवाजे वंचितांसाठी बंद असताना, शिक्षणालाच आपले हत्यार बनवून त्यांनी सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी केली. त्यांच्या याच प्रेरणादायी संघर्षाचे ज्वलंत आणि जिवंत चित्र प्रा. कुमार आहेर (सर) यांनी आपल्या प्रभावी एकपात्री सादरीकरणातून रसिकांसमोर उभे केले. प्रा. कुमार आहेर यांच्या ओघवत्या वाणीने आणि ताकदीच्या अभिनयाने उपस्थितांच्या अंगावर काटा आणला. नाटक आणि सादरीकरणाच्या माध्यमातून जेव्हा मुक्ता साळवे यांच्या वेदना, त्यांचा संघर्ष आणि त्यांची जिद्द मांडली गेली, तेव्हा उपस्थित प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. या कलाकृतीमुळे बहुजन समाजात एक नवी चेतना निर्माण होत असून, आजच्या तरुणाईला त्यांच्या खऱ्या इतिहासाची ओळख होत आहे. विषमतेच्या अंधारात शिक्षणाची मशाल पेटवणाऱ्या मुक्ता साळवे यांचा हा प्रवास आजच्या तरुण पिढीला मोठी प्रेरणा देणारा ठरत आहे.

सद्भावना मंचने या उपक्रमाचे आयोजन करून समाजातील प्रबोधन अधिक तीव्र करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. अशा वैचारिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळेच खऱ्या अर्थाने महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार घराघरांपर्यंत पोहोचत आहेत. सामाजिक जाणिवा समृद्ध करणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून मोठे कौतुक होत असून, भविष्यातही अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमांची शहरात आणि ग्रामीण भागात नितांत आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

### काल्याचे शाश्वत सुख प्राप्त होण्यासाठी आपल्या इंद्रियांना भगवंताच्या भक्तीकडे वळवा-स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज

नेवासा : (स. गांवकरी)



नेवासा तालुक्यातील जायगुडे आखाडा येथे राष्ट्रसंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने श्रावण मासानिमित्त हनुमान मंदिरामध्ये आयोजित त्रिदिनात्मक अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्री क्षेत्र देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात करण्यात आली.काल्याचे शाश्वत सुख प्राप्त करून घ्यायचे असेल तर आपल्या इंद्रियांना भगवंताच्या भक्तीकडे वळवा असे आवाहन स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांनी यावेळी बोलताना केले.

अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाच्या प्रसंगी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या समवेत शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली.यावेळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या वतीने लेझीम झांज पथकाद्वारे स्वागत करण्यात आले.वाड्या वस्त्यांवरील महिला भाविकांच्या वतीने सडा मार्जन करून व रांगोळया घालून संतपूजनाद्वारे स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराजांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज म्हणाले की धार्मिक सोहळे हे गावोगावी साजरे होतात त्यासाठी देव व धर्माचे कार्य समजून सर्वांनी सहकार्य केले पाहिजे,देवाची सेवा म्हणून केलेली सेवा ही जीवनात नेहमी फलदायी ठरत असते,यामुळे शुद्ध पुण्याची प्राप्ती आपल्याला होत असते,देवाची प्राप्ती व त्याची कृपा होण्यासाठी तसेच आपल्या आत्मउध्दारासाठी जीवनात परमार्थ करा,देवाला प्रसन्न करण्याकरता भक्ती करा,त्यासाठी कर्म व आपली कर्तव्ये निष्काम भावनेने करा,त्यासाठी अंतकरणात भक्ती पिकवा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी पारायण सोहळा कमिटीच्या वतीने बाबासाहेब चव्हाण,अशोक बेद्रे,विलास कोकणे,दत्ता जायगुडे,अशोक गंडाळ, गणेश गंडाळ,चैतन्य तनपुरे, आबा कोतकर,गणेश जायगुडे, ज्ञानेश्वर जायगुडे,महेश चव्हाण अमोल चव्हाण, भारत चव्हाण, किरण चव्हाण, संतोष तनपुरे, पविन चव्हाण, शरद चव्हाण यांच्या वतीने स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांचे संतपूजन पुष्पहार घालून व वस्त्र देऊन करण्यात आले. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी देवगडचे मुख्य चोपदार व संतसेवक बाळू महाराज कानडे,अगस्ती देवस्थान सेवेकरी हभप भिसे बाबा, पारायण व्यासपीठ प्रमुख हभप विजय महाराज पवार, गायनाचार्य हरी महाराज भोगे,ऋषिकेश महाराज वाल्हेकर,मृदुंगाचार्य कानिफनाथ महाराज जाधव,गौरव महाराज तनपूरे,रामनाथ महाराज शेळके,श्रीधर महाराज अनुभुले,गणेश महाराज दरंदले,जगन्नाथ महाराज पटारे, शंकर महाराज तनपूरे,बदाम महाराज पठाडे,दादासाहेब गंडाळ, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली पेचे,शंकरबाबा जायगुडे यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## १४ तासांत ५१ रोबोटिक बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया

पुणे : (स. गांवकरी)



■ डॉ. मोहित भंडारी आणि टीम मोहकचा विक्रमाचा दावा

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधत डॉ. मोहित भंडारी आणि टीम मोहक यांनी १५ ऑगस्ट रोजी अवघ्या १४ तासांत ५१ रोबोटिक बॅरिएट्रिक आणि मेटाबोलिक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केल्याचा दावा केला आहे. या उपक्रमात सहा रोबोटिक प्रणाली, एक नियुक्त कन्सोल सर्जन आणि अत्यंत समन्वयित भारतीय वैद्यकीय पथक सहभागी झाले होते. या उपक्रमासाठी व्यापक नियोजन, प्रमाणित शस्त्रक्रिया पद्धती, शल्यचिकित्सक, भूलतज्ज्ञ, परिचारिका आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांमधील समन्वय तसेच सलग १४ तास गुणवत्तापूर्ण शस्त्रक्रिया करण्याची क्षमता आवश्यक होती. एकूण ५१ रुग्णांवर या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. त्यामध्ये ३० पुरुष आणि २१ महिलांचा समावेश असून, रुग्णांचे वय २१ ते ७७ वर्षे होते. रुग्णांचे सरासरी वय ४३.६ वर्षे आणि सरासरी वजन सुमारे १२२ किलो होते. डॉ. मोहित भंडारी यांनी आतापर्यंत ४० हजारांहून अधिक बॅरिएट्रिक शस्त्रक्रिया केल्याचे सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर ५१ रुग्णांवर एकाच उपक्रमात करण्यात आलेल्या रोबोटिक बॅरिएट्रिक आणि मेटाबोलिक शस्त्रक्रिया त्यांच्या व्यापक अनुभवाचे आणि टीमच्या कार्यक्षमतेचे उदाहरण मानले जात आहे.

या प्रयत्नाची बाह्य देखरेख करण्यात आली असून, औपचारिक मान्यतेसाठी गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सकडे आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे अधिकृत विक्रमाची नोंद झाल्यानंतरच या कामगिरीला अंतिम विक्रमाचा दर्जा मिळणार आहे.

## लैंगिक अत्याचारातील पिढीतील न्याय मिळावा या मागणीसाठी आमरण उपोषण

### आरोपीला तात्काळ अटक करू एमआयडीसी पोलिसांच्या पत्राने आमरण उपोषण आंदोलन स्थगित

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




लैंगिक अत्याचारातील पिडित महिलेला न्याय मिळावा. तसेच एमआयडीसी पोस्टे गुरनं. ४६९/२०२६ बी.एन.एस कलम ६४, ३५१(२) अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी नामे प्रविण ऊर्फ बबलु दत्तात्रय गुंड ( रा.शेंडी ता. जि. अहिल्यानगर) यास तात्काळ सदर गुन्हयात अटक करावी.या मागणीसाठी दि.१५/०८/२०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट महिला आघाडीच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष ज्योती फ्रान्सिस पवार यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण करण्यात आले. गेल्या दि. २५ जून २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला असून आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेले नाही पीडित आरोपी मुक्तपणे फिरत असल्याने पीडित महिला व कुटुंबाला त्रास सहन करावा लागत आहे आरोपीला अटक करावी व पीडित महिलेला न्याय मिळावा.आरोपीला तात्काळ अटक न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आंदोलनास पाठिंबा देत ओबीसी व्हिजेएनटी जन मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला. यावेळी बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड, सकल माळी समाजाचे अनिल इवळे,विनोद पुंड,कॅप्टन सुधीर पुंड आदींसह विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

आरोपीला अटक करण्यात येईल.याबाबत चे पत्र एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी रिपब्लिकन पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योती पवार व ओबीसी व्हिजेएनटी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांना पत्र देऊन तसेच उपोषण करताना लिंबू सरबत देऊन हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील आरोपी नामे प्रविण ऊर्फ बबलु दत्तात्रय गुंड,रा. शेंडी ता. जि. अहिल्यानगर यास आम्ही दि.१८/०८/२०२६ रोजी पावेतो किंवा त्या अगोदर अटक करुन त्यास मा. न्यायालयासमोर हजर करण्याची तजविज ठेवली आहे. तसेच सदर आरोपीचे अटक पूर्व जामीन ना मंजुर होणेकरीता मा. न्यायालयात तसे म्हणने सादर करुन आपणास योग्य तो न्याय मिळवुन देण्यासाठी प्रयन्तशिल राहु. तरी आपण आम्हास सहकार्य करुन आपले आमरण उपोषण तात्पुरत्या स्वरुपात स्थगीत करावे.

असे पत्र आंदोलनकर्त्यांना एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या वतीने देण्यात आले आहे. या आमरण उपोषणात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे सुशांत म्हस्के, प्रतीक बारसे,दानीश शेख, विश्रांती पठारे,रेश्मा जाधव, संगीता पाटोळे,प्रियंका पठारे, शितल नाटीकर,यादव सुसे, चांगदेव गवळी, दत्ता जाधव, गणेश गवळी,सागर शिंदे,चंदू सुसे,प्रशांत जावळे,घनश्याम जावळे,श्रीकांत गवळी, अविनाश शिंदे,बाबासाहेब पडोळे,किशोर शिंदे,बबन शिंदे, नानाभाऊ सुसे,भीमराज शिंदे,आनंद शिंदे आदींनी सहभाग घेतला होता.

# थोडक्यात पण महत्वाचे



## एआयच्या तंत्रज्ञानाचा योग्य वापर छायाचित्रकार यांनी करावा

रावेर (स. गांवकरी) : रावेर येथे छाया चित्रकार दिनाच्या अनुषंगाने आयोजित कार्यक्रमात अधिकारी पत्रकार आणी छायाचित्रकार यांचा संवाद कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अध्यक्ष स्थानी पोनी संदीप पाटील हे होते तरी प्रमुख वक्ते जेष्ठ पत्रकार दीपक नगरे, दिलीप वैद्य हे होते प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष शीतल पाटील रावेर शिक्षण संवर्धक संघ संचालक तुषार मानकर डी डी वाणी सुनील महाजन गणेश महाजन गणेश खरे संतोष नवले , कांतीलाल गाढे ,हे उपस्थित होते प्रास्ताविक व सूत्रसंचालन मोनू महाजन व विक्रांत मराठे यांनी केले. कॅमेरे पूजन करून कार्यक्रमास सुरवात करण्यात आली दीपक नगरे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, फोटोग्राफी चे तंत्रज्ञान वेगाने बदलत गेले आहे. या वाटचालीत फोटो ग्राफरने होणारे बदल आत्मसात करावे आणी होणाऱ्या धावपळीत आपल्या सह आपल्या कुटुंबाचे आरोग्य जपले पाहिजे तरी दिलीप वैद्य यांनी फोटोग्राफीचा इतिहासाला उजाळा देत अनेक रंजक आठवणी सांगून सर्वांनी काळानुरूप तंत्रज्ञान अवगत करावे. असेही आवाहन केले. पोनी संदीप पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, रोल कॅमेरा ते आजचे ए आय तंत्रज्ञान या वाटचाली विषयी मार्गदर्शन करतांना म्हटले की, फोटोग्राफी करत असतांना आपले कौशल्य आणी तंत्रज्ञान यांची सांगड बसवून व्यवसाय करावा कोणत्याही अमिषाला व व्यसनाधीनतेला बळी पडू नका आभार तसलीम तडवी यांनी मानले. तरी परिश्रम रावेर तालुका छायाचित्रकार मित्र परिवार व सर्व पदाधिकारी यांनी सहभाग घेतला.





## विष्णू बुरे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचा सत्कार!

मुंबई (स. गांवकरी) : दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी तथा समाजसेवक विष्णू बुरे यांच्या वाढदिवसानिमित्त मुंबई व कोकण विभागीय संपर्क कार्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना वही, पेन व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच पत्रकार बांधवांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहन मिळाले. कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दशरथ चव्हाण, दैनिक समर्थ गांवकरीचे मंत्रालय प्रतिनिधी विष्णू बुरे, पत्रकार कल्याण हनुवंते, जे. के. पोळ, राजू मिर, कलाम शहा, अवधेश यादव, अब्बू कुरेशी, महेश जाधव तसेच शाळेतील शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत भविष्यात उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रेरणा दिली. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक व उपस्थित मान्यवरांनी विशेष सहकार्य केले.

## आरोग्य विमा ही काळाची गरज; गंभीर आजारात बचतीला संरक्षण



भिवंडी (स. गांवकरी) : वाढत्या वैद्यकीय खर्चाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विमा हा आता पर्याय नसून प्रत्येक कुटुंबाची गरज बनली आहे. एका गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे आयुष्यभराची बचत उपचारांवर खर्च होऊ शकते. त्यामुळे भविष्यातील आर्थिक संकट टाळण्यासाठी योग्य आरोग्य विमा संरक्षण घेणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन भारत भूषण सन्मानित व भारत विमा सेवेचे संस्थापक सदस्य डॉ. प्रमोद कुमार झा यांनी केले. भिवंडीतील आयएनएस फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने बुधवारी आयोजित केलेल्या 'आरोग्य धन संपदा' या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी वाढत्या हॉस्पिटल खर्चाकडे लक्ष वेधत आरोग्य विम्याचे महत्त्व स्पष्ट केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष इम्रान सय्यद,संतोष सोनावणे यांच्यासह नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते खासगी रुग्णालयांमधील उपचारांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला असून, गंभीर आजाराच्या उपचारासाठी लाखो रुपये खर्च होऊ शकतात. अशा परिस्थितीत विमा संरक्षणामुळे कुटुंबाची बचत सुरक्षित ठेवण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. कुटुंबातील सदस्यांची संख्या आणि आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन किमान १० ते २० लाख रुपयांचे फॅमिली फ्लोटर कव्हर घेण्याचा विचार करावा. त्यासोबत टॉप-अप पॉलिसी घेतल्यास तुलनेने कमी प्रीमियममध्ये अधिक विमा संरक्षण मिळू शकते. तसेच पॉलिसी घेताना तिच्या अटी, वेटिंग पीरियड, हॉस्पिटल नेटवर्क आणि विविध खर्चांच्या कव्हरेजची माहिती काळजीपूर्वक तपासावी, असे आवाहन डॉ. झा यांनी केले. आरोग्य विम्यावर केलेला खर्च हा भविष्यातील आर्थिक संकटापासून संरक्षण देणारी गुंतवणूक आहे. योग्य विमा कवचामुळे आणीबाणीच्या काळात कर्जाचा भार टाळता येतो अशी प्रतिक्रिया यावेळी डॉ. प्रमोद कुमार झा यांनी सांगितले.

## शिवसेनेच्या मागासवर्गीय सेल भोकर तालुका प्रमुखपदी श्याम वाघमारे



भोकर (स. गांवकरी) : शिवसेना पक्षाच्या मागासवर्गीय विभागाच्या भोकर तालुका प्रमुखपदी श्याम किशन वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख मंगेश नारायणराव कदम यांनी दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी नियुक्तीपत्र देऊन ही घोषणा केली. शिवसेनेचे प्रमुख नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विभागाचे मुख्य समन्वयक राम पांडागळे, शिवसेना उपनेते आमदार हेमंत पाटील, संपर्कप्रमुख रमाकांत म्हात्रे, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंद शिंदे बोडारकर, आमदार बाबुराव कदम कोहळीकर तसेच जिल्हाप्रमुख मंगेश कदम यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आल्याचे नियुक्तीपत्रात नमूद करण्यात आले आहे. वाघमारे यांच्यावर शिवसेना पक्षाच्या मागासवर्गीय विभागाची भोकर तालुक्यात संघटनात्मक बांधणी मजबूत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. पक्षाची ध्येयधोरणे व विचारसरणी तळागाळापर्यंत पोहोचविण्यासह मागासवर्गीय समाजातील नागरिकांना संघटित करण्यासाठी आपण प्रभावीपणे कार्य करू, अशी अपेक्षा पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. नियुक्तीबद्दल श्याम किशन वाघमारे यांचे शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांकडून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या नियुक्तीमुळे भोकर तालुक्यात शिवसेनेच्या मागासवर्गीय विभागाच्या संघटनात्मक कार्याला बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

# पोलीस मित्र सोशल फौंडेशनच्या पाठपुराव्याला यश

### सोलापुरातील २८ पैकी २३ पोलिस चौक्या पुन्हा सुरू बीट मार्शलसह चार अंमलदार चौकीत असणार



सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर शहरात सात पोलिस ठाणे आहेत नागरिकांच्या सोयीसाठी पोलिस ठाण्याअंतर्गत २८ पोलिस चौक्या निर्माण करण्यात आल्या आहेत. मात्र, तत्कालीन पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांनी चौक्यांमधून चालणारे कामकाज बंद केले होते. सोलापूर शहरातील बंद असलेल्या पोलीस चौक्या सुरू करणे बाबत पोलीस मित्र सोशल फाउंडेशन वतीने सोलापूरचे पोलीस आयुक्त एम राजकुमार तसेच जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त पुणे यांना निवेदन सादर करून बंद अवस्थेत असलेल्या पोलीस चौक्या सुरू करणे बाबत सातत्याने पाठपुरावा केला होता याबाबत विभागीय आयुक्त पुणे यांनी पोलीस मित्र सोशल फाउंडेशनच्या निवेदनाची दखल घेऊन सोलापूर शहरातील बंद असलेल्या पोलीस चौकी सुरू करणे बाबत पोलीस आयुक्त यांना पत्र देखील दिले होते.

पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी अखेर बंद अवस्थेत असलेल्या पोलीस चौक्या पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे सध्या २३ चौक्या सुरू करण्यात आल्या असून तेथे आता बीट मार्शलसह एकूण चार ते सहा अंमलदार असतील सोलापूर शहरात चोरी, घरफोडी, दुचाकी चोरी असे गुन्हे अन्य गुन्ह्यांच्या तुलनेत अधिक घडतात. दुसरीकडे रस्त्यांवर शिवीगाळ दमदाटी हाणामारीचेही प्रकार होतात. याशिवाय कौटुंबिक या पार्श्वभूमीवर नागरिकांना आता तत्काळ पोलिसांची मदत मिळावी, या हेतूने पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी बंद पडलेल्या पोलिस चौक्या पुन्हा उघडण्याचा निर्णय घेतला आहे. फौजदार चावडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मार्केट (होम मैदानाजवळील ) चौकी, सम्राट चौकी एमआयडीसी पोलीस चौकीचे नूतनीकरण करण्यात आले आहे. याशिवाय अन्य २० पोलिस चौक्या देखील सुरू आहेत. त्याठिकाणी नियमित पोलिस अंमलदार असतील, अडचणीतील नागरिकांना आता तेथून पोलिसांची मदत घेता येणार आहे. पोलिस चौक्या नागरिकांच्या मदतीसाठी व सोयीसाठी असणार आहेत. अडचणीतील नागरिकांनी 'डायल ११२' वर कॉल करून मदत मागितल्यानंतर काही मिनिटात त्यांना पोलिसांची मदत मिळू शकणार आहे. पण, गुन्हा तथा 'एफआयआर'ची नोंद पोलिस ठाण्यातच होईल. गुन्हा दाखल करण्यासाठी नागरिकांना संबंधित पोलिस ठाण्यातच यावे लागणार आहे. पोलिस चौक्यांमध्ये आता सीसीटीव्ही देखील बसविले जाणार आहेत या परिसरात अंमलदार नियमित गस्त देखील घालतील. दरम्यान, फौजदार चावडी कसबा व आयुर्वेद पोलिस चौकी, जोडभावी पेठ पोलिस ठाण्याअंतर्गत शेळगी आणि सलगर वस्ती पोलिस ठाण्याअंतर्गत असलेली रामवाडी, या पोलिस चौक्याही काही दिवसांत सुरू होणार आहेत.

पोलीस आयुक्तालयातील २८ पैकी २५ पोलिस चौक्या सुरू आहेत. उर्वरित पाच चौक्या पुन्हा सुरू करण्याची प्रक्रिया आहे. या ठिकाणी नागरिकांना सहजपणे पोलिसांची मदत मिळेल. पोलिसांची त्या परिसरात गस्त राहील, जेणेकरून गुन्हे घडणार नाहीत. सोलापूर शहरातील बंद अवस्थेत असलेल्या पोलीस चौक्या सुरू करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी घेतल्याने पोलीस मित्र सोशल फाउंडेशन वतीने पोलीस आयुक्त एम राजकुमार यांचे आभार मानले आहेत.

## 'सेमिकॉन इंडिया 2026' चे 17 ते 19 सप्टेंबर दरम्यान आयोजन

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

सेमिकॉन इंडिया 2026 च्या पाचव्या आवृत्तीचे अधिकृत उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दिनांक 17 सप्टेंबर 2026 रोजी नवी दिल्लीतील यशोभूमी (इंडिया इंटरनॅशनल कन्व्हेन्शन अँड एक्स्पो सेंटर) येथे संपन्न होणार भारताच्या सेमीकंडक्टर प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणून, सेमिकॉन इंडिया 2026 जागतिक सेमीकंडक्टर परिसंस्थेतील प्रमुख भागधारक, सरकार आणि उद्योगातील नेते, उद्योग तज्ज्ञ, शैक्षणिक संस्था, सरकारी अधिकारी आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणेल.

सेमीकॉन इंडिया कार्यक्रमाच्या माध्यमातून इंडिया सेमीकंडक्टर मिशन (आयएसएम) अंतर्गत भारताच्या सेमीकंडक्टर प्रवासाला लक्षणीय गती मिळते आहे. देशात चैतन्यदायी सेमीकंडक्टर उत्पादन परिसंस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने सेमीकॉन 1.0 अंतर्गत 12 प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाने पुढील टप्प्यात म्हणजेच उदा. सेमीकॉन 2.0, भारतातील मजबूत तसेच लवचिक सेमीकंडक्टर परिसंस्थेच्या विकासाला चालना मिळणार आहे.

सेमीकंडक्टर्सला पायाभूत उद्योग म्हणून मान्यता देत, सरकार 332 हून अधिक शैक्षणिक संस्था आणि 105 स्टार्ट-अप्सना अत्याधुनिक रचना साधने पुरवून संशोधन, नवोन्मेष आणि डिझाइनला पाठिंबा देत आहे. याव्यतिरिक्त, डिझाइन लिंक्ड इंसेंटिव्ह (डीएलआय) योजनेंतर्गत 24 स्टार्ट-अप्सना मंजुरी देण्यात आली आहे. ज्यामुळे भारतीय नवोन्मेषकांना महत्त्वपूर्ण अनुप्रयोगांवर काम करता येईल. हे उपक्रम आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत असलेल्या देशातील मजबूत आणि समग्र सेमीकंडक्टर परिसंस्थेच्या विकासात योगदान देत आहेत.

## रुंभोडी ग्रामसभेत करकपातीसह विविध मागण्यांवर जोरदार चर्चा!

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील राजकीयदृष्ट्या प्रगत असलेल्या रुंभोडी गावची ग्रामसभा १५ ऑगस्ट रोजी न होता मंगळवारी ग्रामपंचायत सभागृहात प्रशासक रवींद्र मालुंजकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. ग्रामसभेला तरुणांसह महिला व ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. सुरुवातीला ग्रामपंचायत अधिकारी जी. आर. धराडे यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. भोरकडा येथे गतवर्षी वृक्षलागवड करण्यात आली असताना मोठी झाडे तोडण्यात आली होती. त्यांचा सार्वजनिक जाहीर लिलाव न करता वैयक्तिक व्यापाऱ्याला दिल्याचा मुद्दा सामाजिक कार्यकर्ते संतोष मालुंजकर यांनी उपस्थित केल्याने ग्रामसभेत सुरुवातीलाच जोरदार चर्चा झाली. यावर सरपंचांनी स्पष्टीकरण देत प्रश्नाचे निराकरण केले. ग्रामसभेच्या सुरुवातीलाच नाशिक-पुणे उच्चगती रेल्वेमार्ग मूळ संकल्पनेनुसार देवठाणमार्गेच गेला पाहिजे, असा ठराव रेल्वे कृती समितीचे सदस्य तथा पत्रकार भाऊसाहेब वाकचौरे यांनी मांडला. या ठरावाला ग्रामसभेने एकमताने मंजुरी दिली. आरोग्य उपकेंद्राच्या डॉक्टर सौ. गुंजाळ यांनी महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती दिली. तसेच २०११ पूर्वी शासकीय जागेवर बांधण्यात आलेली निवासी घरे नियमानुसार नियमित करण्याबाबत ग्रामस्थांना माहिती देण्यात आली. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वेक्षणानुसार मंजूर झालेल्या १७० लाभार्थ्यांची यादी वाचण्यात आली. पक्की आरसीसी घरे असलेल्या व्यक्तींची नावे यादीतून वगळण्यास ग्रामसभेने मान्यता दिली. पूर्वी मंजूर होऊन अद्याप काम सुरू न केलेल्या घरकुल लाभार्थ्यांबाबतही चर्चा करण्यात आली. गावाला स्वच्छ व पुरेशा दाबाने पाणी मिळावे, नवीन पाण्याची टाकी तातडीने सुरू करावी, मूळ टाकीतून टीसीएल पावडर टाकून शुद्ध पाणी सर्व भागांना टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून द्यावे, तसेच रस्त्यांवरील खड्ड्यांमध्ये मुरूम टाकावा, अशा मागण्या ग्रामस्थांनी केल्या. ग्रामपंचायतीने शासनाच्या आदेशानुसार घरपट्टी व पाणीपट्टी मोठ्या प्रमाणात वाढविल्याने त्याप्रमाणात मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली. वाडी-वस्त्यांवर सुविधा नसतानाही कर आकारला जात असल्यास त्याचे सर्वेक्षण करून अनावश्यक कर कमी करण्यासाठी वरिष्ठ कार्यालय व शासनस्तरावर पत्रव्यवहार करावा, अशी मागणी किसन मालुंजकर यांनी केली. ग्रामपंचायतीकडे अत्यल्प खर्चाचे अधिकार नसल्याने नागरी सुविधा देताना अडचणी येत असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले. नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्याचे आश्वासन प्रशासक व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी दिले. ग्रामसभेला विविध विभागांचे अधिकारी उपस्थित नसल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी जी. आर. धराडे, पोलीस पाटील गोरक्ष शिंदे, प्रशासक रवींद्र मालुंजकर, बाळासाहेब मालुंजकर, अतुल लोहोटे, रमेश सावंत, शिवाजी सावंत, उपसरपंच भाऊराव मधे, सुभाष मालुंजकर यांच्यासह तरुण व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डिजिटल बळ; ३० अधिकारी-कर्मचाऱ्यांना लॅपटॉपचे वितरण

### शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ जलदगतीने मिळण्यास होणार मदत

कळवण : (स. गांवकरी)



कृषी क्षेत्रातील विविध अडचणी, शेतकऱ्यांच्या समस्या आणि शासनाच्या कृषी योजनांचा लाभ अधिक जलद व पारदर्शक पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विभागाच्या कामकाजाला डिजिटल बळ देण्यात आले आहे. कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ३० लॅपटॉपचे वितरण करण्यात आले.

दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या कार्यक्रमात मा. आमदार.नितीन पवार, नगराध्यक्ष. कौतिक पगार तसेच सहायक जिल्हाधिकारी डॉ.कश्मीरा संखे, तहसीलदार रोहिदास वारोळे,गट विकास अधिकारी रमेश वाघ,पुरवठा अधिकारी धुमाळ साहेब, तालुका कृषी अधिकारी वाल्मीक पाटील,यांच्या उपस्थितीत कृषी विभाग,कृषी आयुक्तालय पुणे यांच्या मार्फत हे लॅपटॉप अधिकारी-कर्मचाऱ्यांना वितरित करण्यात आले.यामध्ये २४ सहायक कृषी अधिकारी,४उपकृषी अधिकारीआणि २ मंडळ कृषी अधिकारी, अशा एकूण ३० अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. कृषी विभागाचे कामकाज दिवसेंदिवस ऑनलाइन व डिजिटल होत असताना अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक डिजिटल साधने उपलब्ध होणे ही महत्त्वाची बाब मानली जात आहे. शेतकऱ्यांकडून प्राप्त होणारे अर्ज,विविध कृषी योजनांची ऑनलाइन प्रक्रिया, लाभार्थ्यांची माहिती,पीकविषयक माहिती, शासकीय योजनांचे प्रस्ताव तसेच आवश्यक अहवाल आणि कागदपत्रांची ऑनलाइन पूर्तता यामुळे अधिक वेगाने करता येणार आहे. विशेषतःशेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देताना होणारा वेळेचा विलंब कमी होण्यास या सुविधेचा उपयोग होणार आहे. ग्रामीण भागात शेतकऱ्यांना प्रत्येक कामासाठी कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत,यासाठी कृषी विभागाने डिजिटल प्रणालीचा अधिक प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. या दृष्टीने लॅपटॉप वितरणाचा उपक्रम महत्वपूर्ण ठरणार आहे. कृषीअधिकारी व कृषी सहाय्यक हे शासन आणि शेतकरी यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहेत.त्यामुळे त्यांच्या हातात आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झाल्याने शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेणे,त्यांची ऑनलाइन नोंद करणे, संबंधित विभागाशी समन्वय साधणे आणि योजनांची अंमलबजावणी जलदगतीने करणे अधिक सुलभ होणार आहे. शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे हे प्रशासनासमोरील महत्त्वाचे आव्हान आहे. केवळ योजना जाहीर होणे पुरेसे नसून त्या योजनांची माहिती,अर्ज प्रक्रिया आणि प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत वेळेत पोहोचणे गरजेचे आहे.

## पांडुरंग बरोरा यांचे परिवहन मंत्र्यांना निवेदन!

शहापूर : (स. गांवकरी)



शहापूर बस पोर्टच्या नवीन बांध कामाला सात वर्ष उलटून गेली तरी प्रलंबित पडलेल्या कामा संधर्भात माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना तात्काळ काम सुरु करण्यासाठी निवेदन दिले आहे. शहापूरचे जुने बस स्टँड पडण्याच्या स्थितीत होते प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी 2017, मध्ये शहापूरसाठी शासनाकडून नवीन बसपोर्ट मंजूर करून घेतले होते.2018 ला कारडा या कंपनीला हे काम देण्यात आले होते परंतु या कंपनीने ते काम पूर्ण न केल्याने ते काम दुसऱ्या कंपनीला देण्यात आले. परंतु ह्या कंपनीने पण तसंच संथ गतीने काम करून आज पर्यन्त काम पूर्ण न करता बंद ठेवले आहे.शहापूर तालुक्याचे ठिकाण असल्याने शाळेतील विद्यार्थी, महिला, तहसील कार्यालयात कामासाठी येणारे प्रवाशी यांचे बस पोर्ट मध्ये अतिशय गैरसोय होत आहे.पत्र्याच्या बाथरूम, पत्र्याचे शेड, बाजूला गटार, कचराकुंडी,संगळूकडे दुर्गंध प्रवाश्यांची सात वर्षा पासून गैरसोय होत असल्याने माजी आमदार पांडुरंग बरोरा यांनी मंत्रालयात परिवहण मंत्री प्रताप सरनाईक यांना तात्काळ काम चालू करण्यासाठी निवेदन दिले. मंत्री सरनाईक यांनी निवेदन वाचून तात्काळ महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता दिनेश महाजन यांना तात्काक काम सुरु करून डिसेंबर पर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## आमदार केरामांच्या पाठपुराव्याने आदिवासी विद्यार्थ्यांना दिलासा!

किनवट : (स. गांवकरी)



आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशासह उच्च शिक्षणाच्या संधींवर परिणाम करणाऱ्या अन्यायकारक अटींविरोधात किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमराव केराम यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानंतर आदिवासी विकास विभागाने १४ ऑगस्ट २०२६ रोजी सुधारित शासन निर्णय जारी केला असून, विद्यार्थी हिताच्या दृष्टीने अनेक अडचणीच्या तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयातील काही तरतुदींमुळे राज्यातील हजारो आदिवासी विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेश तसेच उच्च शिक्षणाच्या संधींपासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार केराम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून सदर निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी केली होती. वसतिगृह प्रवेशासाठी निश्चित करण्यात आलेली अंतर मर्यादा, उत्पन्नाची अट, उपस्थितीची सक्ती, शैक्षणिक खंडासंबंधीच्या अटी तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाइन करण्याच्या निर्णयामुळे दुर्गम आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, असे आमदार केराम यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले होते.

## छायाचित्रकार हे इतिहासाचे साक्षीदार असतात

### छायाचित्रकाराच्या फोटोतील बदलाची ताकद लोकांच्या स्मरणात राहते : महापौर विनायक कोंड्याल

सोलापूर : (स. गांवकरी)



छायाचित्रकारांनी टिपलेल्या छायाचित्रांमधून एखाद्या परिसरातील विकासाचा पूर्वीचा आणि आताचा बदल नागरिकांच्या नजरेसमोर प्रभावीपणे मांडता येतो. छायाचित्रांमुळे हा बदल लोकांच्या स्मरणात कायम राहतो आणि त्याचा मोठा फायदा होतो, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले. सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि एस. पी. सिक्युरिटी सर्विसेस यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फोटोग्राफर दिनानिमित्त छायाचित्रकार व कॅमेरामन यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महापौर कोंड्याल बोलत होते. विचारमंचावर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार, वै. वा. ह.भ.प. धोंडोपंत दादा यांच्या भजनी सांप्रदायिक फडाचे अध्यक्ष नारायण सुरवसे, फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष संदीप वाडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला.

महापौर कोंड्याल म्हणाले, जगात घडणाऱ्या घटना आणि त्यामधील सातत्य समाजासमोर आणण्याचे काम पत्रकारिता करते. त्याचप्रमाणे छायाचित्रकार आपल्या कॅमेऱ्यातून या घटना आणि क्षण कायमस्वरूपी जतन करतात. त्यामुळे पत्रकारितेसोबत छायाचित्रकारांचेही महत्त्व अनन्यसाधारण आहे.

आपल्या राजकीय प्रवासातील अनुभव सांगताना कोंड्याल म्हणाले की, २००७ मध्ये अपक्ष म्हणून निवडून आल्यानंतर आपल्या प्रभागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात आली. त्यावेळी छायाचित्रकारांनी टिपलेली प्रभागाची जुनी छायाचित्रे २०१२ च्या निवडणुकीत नागरिकांना दाखवून पूर्वीचा आणि नंतरचा बदल समोर ठेवता आला. फोटोमधील हा फरक नागरिकांच्या स्मरणात ठसला आणि त्याचा मला दुसऱ्यांदा निवडून येताना फायदा झाला, असे त्यांनी सांगितले. छायाचित्रकार हे इतिहासाचे साक्षीदार असून, त्यांनी टिपलेला प्रत्येक महत्त्वाचा क्षण पुढील पिढ्यांसाठी मौल्यवान ठरतो, असे कोंड्याल यांनी नमूद केले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला महत्त्वपूर्ण भारतीय पेटंट

## क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या नॅनो-ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला पेटंटची मान्यता

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील औषधनिर्माणशास्त्र संकुलाच्या संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर नोंद झाली आहे. क्षयरोगावरील कमी पाण्यात विरघळणाऱ्या औषधांच्या प्रभावी वितरणासाठी विकसित करण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग डिलिव्हरी तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट प्राप्त झाले आहे. “Nanostructured Delivery Device for Poorly Water-Soluble Anti-Tubercular Drugs and Method Thereof” या नावाने या संशोधनास पेटंट मंजूर झाले असून, पेटंटचा कालावधी २० वर्षांचा आहे. या संशोधनाचे पेटंटधारक व संशोधक म्हणून डॉ. सुरेंद्र जी. गट्टानी, स्वप्नील पाटील आणि प्रदीप निरभवणे यांची नोंद आहे. कमी पाण्यात विरघळणाऱ्या क्षयरोगविरोधी औषधांच्या शरीरातील औषध-वितरण प्रक्रियेत सुधारणा घडवून आणण्यासाठी नॅनो-स्ट्रक्चर्ड ड्रग-डिलिव्हरी पद्धतीचा या संशोधनात वापर करण्यात आला आहे. या तंत्रज्ञानामुळे औषधांची प्रभावीपणे शरीरात पोहोच वाढविण्यास तसेच त्यांच्या उपचारात्मक परिणामकारकतेत सुधारणा करण्यास संभाव्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आधुनिक औषध-वितरण प्रणालीच्या क्षेत्रात हे संशोधन महत्त्वपूर्ण योगदान मानले जात आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर आणि औषधनिर्माणशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. एस. एस. पेकमवार यांनी डॉ. सुरेंद्र गट्टानी व त्यांच्या सह-संशोधकांचे अभिनंदन केले. त्यांच्या संशोधनातून औषधनिर्माणशास्त्र, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा निर्मितीच्या क्षेत्राला चालना मिळणार असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

या पेटंटमुळे औषधनिर्माणशास्त्र संकुलाची संशोधनातील उत्कृष्टता, नवोपक्रम, बौद्धिक संपदा निर्मिती आणि आधुनिक औषध-वितरण तंत्रज्ञानाच्या विकासाप्रती असलेली बांधिलकी अधोरेखित झाली आहे.




मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सरळगाव आणि परिसरात प्रस्तावित एमआयडीसीला शेतकरी वर्गाकडून जोरदार विरोध होत असतानाच, सरळगाव हद्दीतील नेवाळपाडा येथे झालेल्या एकतर्फी जमीन मोजणीचा शेतकऱ्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने एकत्र आले होते. पुरुष शेतकऱ्यांसोबत महिला शेतकऱ्यांनीही आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाच्या कारवाईविरोधात नाराजी व्यक्त केली. ‘शेतकरी एकजुटीचा विजय असो’ अशा घोषणा देत एकतर्फी जमीन मोजणीला विरोध करण्यात आला. पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते दीपक हरड यांनी यावेळी प्रतिक्रिया देताना प्रशासनाच्या भूमिकेचा निषेध केला. शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय किंवा त्यांना विश्वासात न घेता करण्यात येणाऱ्या कोणत्याही कारवाईला विरोध केला जाईल, अशी भूमिका यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## थोडक्यात बातम्या...



### महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांसोबत मेट्रो मार्ग व स्थानक बदल संदर्भात बैठक

ठाणे (स. गांवकरी) : महामेट्रो रेलच्या माजिवडा, ठाणे येथील कार्यालयात ईडन वूड्स रहिवाशांनचे शिष्टमंडळ आणि महामेट्रोचे संचालक श्रावण हर्डीकर कार्यकारी संचालक, आणि सुरेश पाखरे ॲडमिनिस्ट्रेटिव अधिकारी आणि खासदार नरेश म्हस्के यांच्या उपस्थितीत दिनांक १८ ऑगस्ट रोजी रिंगमेट्रो मार्गबदल व स्थानक जागेत बदलबाबत सविस्तर चर्चा झाली. रहिवाशांचा प्रमुख मुद्दा रिंगमेट्रो मार्गबदल आणि स्थानक जागेत बदलबाबत ईडन वूड्स रहिवाशी आग्रही आहेत. खासदार नरेश म्हस्के म्हणाले की, लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या समस्या योग्य पद्धतीने संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणं आणि त्यावर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा करणं ही आपली जबाबदारी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही आणि शहराचा विकासही योग्य पद्धतीने होईल, अशा समन्वयातून या मेट्रोचं काम करण्यात यावं.” असा स्पष्ट संदेश देखील त्यांनी यावेळी महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांना दिला. नागरिकांच्या सर्व सूचना आणि अडचणी समजून घेऊन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल, तसेच त्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले जातील असा शब्द यावेळी महा मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी ईडन वूड्स रहिवाशांना दिला. सदर बैठकीत ईडन वूड्स कॉम्प्लेक्स मधून प्रतिनिधी रजनी पितळे, विवेक सोनार, श्रीदेवी पिल्लै, राजेश अनंतकृष्णन, विलास तसखेडकर, सुधांशू चौसाळकर, दिनेश कांडपाल, श्रीराम नगरकर, रवि अय्यर तसेच हिरानंदानी मेडोस मधून संतोष विश्वनाथन उपस्थित होते. रहिवाशांनी दिलेल्या मौल्यवान सूचना आणि अनुभवी अभियंता श्रीराम नगरकर, रवि अय्यर, राजेश अनंतकृष्णन यांनी मौलिक सूचना केल्या आणि तांत्रिक बाबी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्या.

### विदेशी दारूच्या साठ्यासह ४ आरोपी अटकेत; मुद्देमाल जप्त

डांग-गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्ह्यात अवैध दारू विक्री व असामाजिक प्रवृत्तींविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेच्या (LCB) पथकाने सुबीर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावहाण गावात मोठी कारवाई केली. या कारवाईत मोठ्या प्रमाणात भारतीय बनावटीची विदेशी दारू व बिअरचा साठा जप्त करण्यात आला असून, चार आरोपींना घटनास्थळावरून अटक करण्यात आली आहे. LCBचे PSI जे. जी. अनडकट व त्यांच्या पथकाकडून जिल्हाभरात तपासणी मोहीम सुरू असताना गावहाण गावातील बारीपाडा फळियात राहणाऱ्या सुरेशभाई रेवाभाई देसाई यांच्या घरी कारमधून विदेशी दारूचा साठा आणून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पंचांच्या उपस्थितीत पोलिसांनी तातडीने छापा टाकला. घर तसेच बाहेर उभ्या असलेल्या कारची झडती घेतली असता १८० एमएलच्या विदेशी दारूच्या २,९४९ बाटल्या, ३६० बिअरचे टिन आणि देशी दारूच्या ८९ बाटल्या, असा एकूण ३,३९८ नग दारू व बिअरचा साठा आढळून आला.जप्त केलेल्या दारू व बिअरची किंमत ₹४,३३,५०५ असून, या तस्करीसाठी वापरण्यात आलेली एक मारुती स्विफ्ट कार, दोन मोटारसायकली, तीन अँड्रॉइड मोबाईल फोन आणि ₹५,८५० रोख रक्कम, असा एकूण ₹७,४४,३५५ किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.या प्रकरणात सुरेशभाई रेवाभाई देसाई (वय २४), रेवाभाई हुडीयाभाई देसाई (वय ४४), संजयभाई उर्फ संजू झीमनभाई सिंदे (वय २४) आणि वणकरभाई रमणभाई माळवी (वय २३) यांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत दारूचा पुरवठा करणारे, दारू भरून देणारे तसेच दारू मागविणाऱ्या आणखी ८ जणांची नावे समोर आली आहेत. त्यामुळे सुबीर पोलीस ठाण्यात एकूण १२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### प्राथमिक आरोग्य केंद्राला मंगेश शिंदे यांची सदिच्छा भेट

आळेफाटा (स. गांवकरी) : सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे सहसचिव तथा खाजगीकरण सचिव मा.श्री.मंगेश शिंदे यांनी निमगाव सावा प्राथमिक आरोग्य केंद्राला सदिच्छा भेट दिली. यावेळी पांडुरंगजी पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच उपकेंद्रांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य कर्मचाऱ्यांशी संवाद साधून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींवर चर्चा करण्यात आली. तसेच केंद्र व उपकेंद्रांच्या गरजा, उपलब्ध सुविधा आणि भविष्यात आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधांबाबत माहिती घेण्यात आली. याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र निमगाव सावा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अजिंक्य नाईकवाडे, आरोग्य सहाय्यक श्री. सुनिल यादव, आरोग्य सेवक रविराज शेजुळ, पोपट गांजे, आरोग्य सेविका श्रीमती शानु इनामदार, अर्धवेळ परिचर श्री. भगवान औटी, अलका लोखंडे यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते. दरम्यान, प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी व ग्रामस्थांच्या वतीने पांडुरंगजी पवार यांच्या हस्ते मा.श्री.मंगेश शिंदे साहेब यांचा सन्मान करण्यात आला.

## कांकाडी येथे नागपंचमी उत्साहात साजरी, पंचक्रोशीतील अनेक गावांतील भक्त मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



पंचक्रोशीतील अनेक गावात प्रसिद्ध असलेल्या नांदेड तालुक्यातील कांकाडी गावात नागपंचमी सणा निमित्ताने नागदेव मंदिरात विधीवत पूजन करण्यात आले तर नागपंचमी सणानिमित्त यात्रा भरविण्यात आली होती अनेक गावांतील हजारो भाविक भक्तांनी दर्शन घेऊन यात्रा निमित्ताने आलेल्या अनेक दुकानातून मुर्ती सह अनेक वस्तू खरेदी केली, ग्रामीण पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर ग्रामपंचायत कार्यालय यांच्या वतीने नाल्या व गावातील प्रमुख रस्त्यांची साफ सफाई व मंदिर परिसरात मुरूम टाकून रस्ता तयार करण्यात आला होता. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 17ऑगस्ट रोजी नागपंचमी सणानिमित्त कांकाडी गावात नागदेव मंदिरात विधीवत पूजन व गावात यात्रा भरविण्यात आली होती, सकाळपासून पंचक्रोशीतील अनेक गावांतील हजारो भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली होती.मंदीराचे पुजारी क्रांती किरण मगरे यांनी विधीवत पूजन केले तर गेल्या अनेक वर्षांपासून आनंद मगरे, राहुल मगरे अशोक मगरे,प्रविण मगरे,विनायक मगरे, गणपत हणमंते हे परिवारातील सदस्य हे गेल्या अनेक वर्षांपासून नागपंचमी सणानिमित्त परंपरा जोपासत सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. यात्रेसाठी आलेल्या भाविक भक्तांना पिण्याचे पाणी, अल्पोपहार व्यवस्था करुन गावात विविध ठिकाणी शुभेच्छा फलक लावले होते, ग्रामपंचायत कार्यालय कांकाडी यांच्या वतीने चेअरमन तथा मार्गदर्शक हणमंत भवर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच शरद भवर व ग्रामपंचायत सदस्य यांनी नागपंचमी यात्रेनिमित्त प्रमुख रस्त्यास गावातील नाले सफाई करून नागदेव मंदिर कडे जाणाऱ्या रस्त्यावर मुरूम टाकून दबाई करून देण्यात आली होती.यात्रेनिमीत मंदिर परिसरात व गावातील विविध ठिकाणी प्रसाद, मिठाई, मुर्ती दुकानासह अनेक विक्रेत्यांनी खेळणी,सह दुकाने मोठ्या प्रमाणात थाटली होती तर लहान मुलांसाठी आकाश पाळणे व विविध खेळांचे दुकाने आली होती. ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस अंमलदार, महिला पोलिस, होमगार्ड यांच्या कडेकोट पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गावातील जेष्ठ नागरिक व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व व्यंकट कोंके, माजी उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित नागरीक दशरथ पाटील बागल,शंकर पाटील बागल,यांच्या सह युवक व गावातील नागरिकांनी सहकार्य केले.

## 'भाटा'तून उलगडणार स्वप्नांसाठीच्या संघर्षाची कहाणी

पुणे : (स. गांवकरी)

पारंपरिक समाजरचनेत प्रत्येक समाजघटकाच्या कामाचे स्वरुप निश्चित केलेले होते. मात्र, बदलत्या काळानुसार ही परिस्थिति बदलत गेली आणि नवी पिढी नवी स्वप्ने पाहू लागली. बेलदार समाजातील नव्या पिढीची गोष्ट भाटा या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर सोशल मीडियावर लाँच करण्यात आला आहे.उत्कृष्ट स्टारकास्ट असलेला हा चित्रपट २८ ऑगस्ट रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे.




व्ही. डि. एंटरटेनमेंट आणि मोरया उद्योग समूह यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली असून अरायव्हल स्टुडिओ प्रा. लि. या निर्मिती संस्थेने "भाटा" या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सुनील आबा जाधव आणि विजय चंद्रकांत चव्हाण हे या चित्रपटाचे निर्माते आहेत. रिजवान शेख, मितेश पराडकर, सुनील कातकर हे या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. भरतराज नारायण यादव यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. या चित्रपटाची कथा विजय चंद्रकांत चव्हाण यांची आहे, तर पटकथा आणि संवाद शरद कारंडे यांचे आहेत. श्रेयस आंगणे यांनी चित्रपटाची गाणी लिहिली असून संगीतही त्यांचेच आहे तर छायाचित्रण हरेश सावंत यांचे आहे. .सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी, अभिनेते अरुण नलावडे, प्रशांत मोहिते अभिनेत्री रुपाली जाधव, विजय कदम, अनिल नगरकर, लक्ष्मण देवभट, प्रेमा किरण बालकलाकार तनिष्का जाधव यांचा दमदार अभिनय आपल्याला पहायला मिळणार आहे.

## दिवा-आगासन रस्त्यावर बेकायदा पार्किंगमुळे वाहतूककोंडीचा विळखा



ठाणे: (स. गांवकरी)

दिवा-आगासन रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर पद्धतीने वाहने उभी केली जात असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. या कोंडीचा सर्वाधिक त्रास शाळकरी विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या कडेला अनेक वाहनचालक आपली दुचाकी, चारचाकी वाहने तासनतास उभी करून इतरत्र निघून जात असल्याने रस्त्याची मोठी जागा व्यापली जाते. त्यातच काही मोटारसायकल शोरूमकडून नवीन मोटारसायकलींचे प्रदर्शनही रस्त्यावरच करण्यात येत असल्याने वाहतुकीच्या समस्येत आणखी भर पडत आहे. दिवा-आगासन मार्गावर वाहनांची संख्या मोठी असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना होणाऱ्या अशा बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहनांना मार्ग काढताना मोठी कसरत करावी लागते. परिणामी सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर होत आहे. वाहतूक पोलिसांनी आणि संबंधित प्रशासनाने या मार्गाची पाहणी करून रस्त्यावर होणारे बेकायदा पार्किंग तत्काळ हटवावे तसेच रस्त्यावर वाहने उभी करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आदिवासी बांधवांसाठी गरज पडल्यास रस्त्यावर उतरू : खासदार डॉ. अमोल कोल्हे

शिवनेरी : (स. गांवकरी)




जुन्नर तालुक्यातील आडोशी-अंजनावळे, तसेच ठाणे जिल्ह्यातील मुरबाड व भोरांडे परिसरात प्रस्तावित असलेल्या १,५०० मेगावॅट क्षमतेच्या माळशेज घाट–भोरांडे उदंचन जलविद्युत प्रकल्पाची २१ ऑगस्ट रोजी होणारी जनसुनावणी तात्काळ स्थगित करावी. यासाठी संसदेत लढू, न्यायालयात दाद मागू आणि गरज पडल्यास आदिवासी भूमिपुत्र बांधवांसाठी रस्त्यावर उतरू, असा थेट इशारा खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी केंद्र व राज्य सरकारला दिला. किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आदिवासी भागातील पेसा कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. ठाणे जिल्ह्यातील धसई येथे २१ ऑगस्ट रोजी होणारी जनसुनावणी तात्काळ स्थगित करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

देशाला ऊर्जा साठवणुकीची गरज आहे, हे मान्य आहे. मात्र नियम वाकवून स्थानिक आदिवासी व शेतकऱ्यांना अंधारात ठेवत आणि सह्याद्रीच्या पर्यावरणाचा विध्वंस करून प्रकल्प लादला जात असेल, तर तो कोणत्याही परिस्थितीत मान्य केला जाणार नाही, असे डॉ. कोल्हे यांनी स्पष्ट केले. या परिसरात बिबट्या, शेकरू, नीलगाय, रानडुक्कर, कोल्हा आणि सांबर यांसारख्या अनुसूची-१ मधील प्रजाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. हा भाग मानव-बिबट्या संघर्षाचा तीव्र क्षेत्र असतानाही प्राण्यांचे अस्तित्व नाकारून वनक्षेत्राच्या नुकसानीचे चुकीचे मूल्यमापन केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. सुमारे ५.२ हजार वर्षांचा नाणेघाटचा वारसा आणि संवर्धन राखीव क्षेत्राकडेही दुर्लक्ष केले जात असल्याचे त्यांनी सांगितले. राज्य वन्यजीव मंडळाने मंजूर केलेल्या ९८.७८ चौ. कि.मी. नाणेघाट संवर्धन राखीव क्षेत्राचा तसेच भीमाशंकर-कळसुबाई वन्यजीव मार्गिकेचा अहवालात साधा उल्लेखही नसल्याचे डॉ. कोल्हे यांनी निदर्शनास आणून दिले. नाणेघाटातील सातवाहनकालीन लेणी आणि शिलालेख हे प्रस्तावित प्रकल्पाच्या अतिशय जवळ आहेत. प्रकल्पामुळे होणारे मोठे स्फोट आणि कंपनांमुळे या ऐतिहासिक वारशाला धोका निर्माण होऊ शकतो. हा संपूर्ण परिसर भूकंपप्रवण क्षेत्र क्रमांक तीनमध्ये येतो. त्यामुळे २०१४ मधील माळीण दुर्घटनेची पुनरावृत्ती निसर्गाची छेडछाड करून घडवून आणायची आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. प्रकल्पासाठी सहा तास वीज निर्मितीसाठी ७.०६ दशलक्ष घनमीटर पाणी फिरवले जाणार असल्याने त्याचा स्थानिक जलस्रोतांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात हे पाणी अडवले गेल्यास माणिकडोह धरणात येणाऱ्या पाण्यावर परिणाम होऊ शकतो. जुन्नर-आंबेगाव परिसरातील नागरिक आणि आदिवासी बांधवांना उन्हाळ्यात आधीच पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गावांपैकी सुमारे ९३ टक्के लोकसंख्या महादेव कोळी, ठाकूर आणि कोकण या अनुसूचित जमातींची आहे. पेसा कायद्यानुसार अशा क्षेत्रात ग्रामसभेची पूर्वसंमती बंधनकारक असताना एकाही ग्रामसभेची मंजुरी घेण्यात आलेली नाही, असा आरोप डॉ. कोल्हे यांनी केला.

### जिल्हाधिकाऱ्यांशी थेट संपर्क

पत्रकार परिषद सुरू असतानाच खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी २१ ऑगस्ट रोजी होणारी जनसुनावणी स्थगित करण्याचे पत्र देण्यात आल्याचे सांगितले. आदिवासी भागातील प्रकल्पाबाबत खुलासा करण्यासाठी लोकप्रतिनिधी, बाधित गावांचे सरपंच, जलविद्युत प्रकल्पाचे अधिकारी आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांची १९ ऑगस्ट रोजी पुणे येथे बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच २१ ऑगस्ट २०२६ रोजी होणारी जनसुनावणी स्थगित करण्याचे स्पष्ट आदेश काढण्यात येतील, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितल्याची माहिती डॉ. कोल्हे यांनी दिली.

## "धरती आबा कर्मचारी दांडी प्रकरण " आता महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीकडे

### कार्यवाही करण्यासाठी निवेदनकर्ते आक्रमक

तामसा : (स. गांवकरी)

देशांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासात्मक दृष्टिकोनातून क्रांतीसुर्य बिरसा मुंडा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित धरती आबा जनजाती उत्कर्ष अभियान मोहिमे अंतर्गत अंमलबजावणी साठी 25 प्राधान्य क्षेत्र व 17 मंत्रालय निश्चित करण्यात आली होती त्यानुसार जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील बारा व हिमायतनगर तालुक्यातील सात गावांचा समावेश करण्यात आला होता परंतु प्रशासनातील उदासीन असणाऱ्या अधिकाऱ्यांनी चक्क या देशव्यापी कार्यक्रमास जाणीव पुर्वक दांडी मारत आदिवासी विकास विभागास खुले आवाहन दिले आहे. या बाबत ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल हिमायतनगर आणि पालक समन्वय समिती हदगाव यांनी संयुक्त पाठपुरावा करून तहसिलदार हदगाव व हिमायतनगर यांनी अनेक शासकीय अधिकारी मुद्दाम अनुपस्थित होते हे ठोस पुराव्यासह सिद्ध केले, पण संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार या अनुपस्थित कर्मचाऱ्यावर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्या मूळ वेतनातून हाच कार्यक्रम पुन्हा घेण्यात यावा ही मागणी अद्यापही प्रलंबित आहे, या बाबत संघटनेने



पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्याचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, आदिवासी विकास विभाग सह संचालक नाशिक, अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, आदींना निवेदन पाठवून कार्यवाहीची मागणी करण्यात आली आहे त्यानुसार जिल्हा प्रशासन यांनी तातडीने या निवेदनाची दखल घेत कार्यवाहीचे आदेश काढले पण कार्यवाही कोणी करावी याबद्दल संभ्रम निर्माण झाल्याने कार्यवाही चा चेंडू आता महाराष्ट्र विधानमंडळ अनुसूचित जमाती कल्याण समितीकडे आल्याने कार्यवाहीचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. या बाबत विधानमंडळ समितीचे अध्यक्ष दौलतराव दरोडा यांनी गंभीर दखल घेत कार्यवाहीचे संकेत दिले आहेत. या बाबत पालक समन्वय समिती हदगाव चे प्रमुख श्री शंकरराव मेंडके, ऑर्गनायझेशन फॉर राइट्स ऑफ ट्रायबल चे संतोष डवरे, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे अंकुश मिराशे यांनी या प्रकरणी गंभीरता समितीकडे मांडली. आजवर जिल्हाधिकारी, प्रकल्प कार्यालय किनवट,उपविभागीय अधिकारी हदगाव, यांनी तहसिलदार हदगाव आणि हिमायतनगर यांच्या अहवालानुसार कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत फक्त आता प्रत्यक्ष कारवाई कोण करणार हे पाहणे गरजेचे आहे. यावेळी उपस्थित बिरसा मुंडा आंध आदिवासी ट्रायबल डॉक्टर असोशियन चे जिल्हाध्यक्ष डॉ संजय मुरमुरे, सुभाष वानोळे, तुकाराम भुरके, आनंदराव डोखळे, संतोष तायवाडे, मंथन वाळके, गजानन भिसे, प्रविण मेश्राम, शुभम धुर्वे, अभय तलांडे , मुकुंद तमलवाड आदीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.. हदगाव आणि हिमायतनगर तालुक्यातील शबरी आदिवासी घरकुल योजनेचा लक्षांक वाढवून द्यावा.

आदिवासी विकास विभाग यांचा 5 ऑगस्ट 2026 चा अन्यायकारक शासनदेश रद्द करण्यात करणे, अधिसंख्य झालेल्या पदे तत्काळ भरण्यात यावे, अद्याप जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदमुक्त करणे, प्रकल्पातील सर्व आश्रम शाळेतील शिक्षकांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात यावे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे



## रामदास आठवले यांनी विविध विभागांच्या योजनांचा घेतला आढावा

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी विविध शासकीय विभागांच्या योजनांचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत योजनांची सद्यस्थिती, अंमलबजावणीतील प्रगती तसेच लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या सुविधांचा सखोल आढावा घेण्यात आला. शासकीय विश्रामगृहात आयोजित या बैठकीत महानगरपालिकेच्या घरकुल योजनेचा, समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचा, जाती पडताळणी समितीच्या कामकाजाचा, अॅट्रॉसिटी प्रकरणांच्या नोंदी व त्यावरील कार्यवाहीचा तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचतो आहे का, तसेच अंमलबजावणीत काही अडचणी आहेत का, याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेण्यात आली. बैठकीस उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या सदस्य डॉ. छाया कुलाल, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे, जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी राजेश एडके, जिल्हा परिषदेचे प्रकल्प संचालक तेलंग, लीड बँकेचे व्यवस्थापक सोनकांबळे यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

## श्री साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन

नवीन नांदेड (स. गांवकरी) : श्रावण मास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ कौठा नांदेड यांच्या वतीने 20 ऑगस्ट रोजी दुपारी 12 वाजता साईबाबा मंदिर कौठा नांदेड येथे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावणमास निमित्ताने श्री साईबाबा मित्र मंडळ यांच्या वतीने श्रावण मास महिन्यातील गुरूवार रोजी दुपारी महाआरती नंतर 12 ते 3 दरम्यान महाप्रसाद आयोजित करण्यात आला असून भाविक भक्तांनी महाप्रसाद लाभ घेण्याचे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे, माधव गुरूपवार, अशोक दिल्लेराव, रमेश यादव,हेमराज लड्ढा,आकाश व साकेत व्यवहारे यांनी केले आहे.

## शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी आवश्यक सुधारणा कराव्यात

नांदेड (स. गांवकरी) : शासन अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम 2026 प्रसिद्ध झाली आहे. या अधिसूचनेतील नियम 6A व्यतिरिक्त इतर सर्व बाबी शालेय बस व शालेय व्हॅनशी संबंधित आहेत. त्यानुसार नांदेड जिल्ह्यातील सर्व शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी या सुधारित नियमांनुसार आपल्या शालेय बस, शालेय व्हॅन तसेच संबंधित व्यवस्थापनामध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात. या सुधारणा 16 जुलै 2026 पासून तीन महिन्यांच्या आत पूर्ण कराव्यात, अशा सूचना प्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी दिल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व संबंधित शालेय बस व शालेय व्हॅन धारकांनी महाराष्ट्र मोटार वाहन (स्कूल बसकरिता विनियम) (पहिली सुधारणा) नियम 2026 चे पालन करून निर्धारित मुदतीत आवश्यक सुधारणा करून घ्याव्यात.

## आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी इमारत भाडेतत्त्वावर हवी

नांदेड (स. गांवकरी) : सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प किनवट यांच्या अधिनस्त असलेल्या आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृह माहूरसाठी इमारत भाडेतत्त्वावर घेणे आवश्यक आहे. 75 प्रवेश क्षमतेच्या या वसतिगृहासाठी #माहूर शहरात सर्व सोयी-सुविधांनी युक्त, 20 ते 25 खोल्या असलेली तसेच बारमाही पाणी उपलब्ध असलेली इमारत आवश्यक आहे. इच्छुक इमारत मालकांनी आपली इमारत उपलब्ध असल्यास गृहपाल, आदिवासी मुलांचे शासकीय #वसतिगृह, माहूर (रेणुका भक्त निवासच्या पाठीमागे) यांच्याशी संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक 7038649239 वर संपर्क साधावा, असे आवाहन आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह माहूर जिल्हा #नांदेड यांनी केले आहे.

## संविधानाचा अवमान करणाऱ्यांच्या निषेधार्थ २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन




पुणे (स. गांवकरी) : भारतीय संविधान आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा अवमान करणाऱ्या जातीयवादी प्रवृत्तीच्या विरोधात पुणे शहर, जिल्ह्यातील सर्वपक्षीय संविधानवादी नागरिकांच्या वतीने २० ऑगस्ट रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती भारतीय संविधान संवर्धन समितीच्या वतीने आज पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी काँग्रेस पक्ष अनुसूचित जाती विभागाचे पुणे (पूर्व विभाग) शहराध्यक्ष कुणाल राजगुरू, विठ्ठल गायकवाड, माजी नगरसेविका लता राजगुरू, संग्राम रोहम आदि मान्यवर उपस्थित होते. देशाच्या घटनात्मक सर्वोच्च पदावर असलेले वरिष्ठ संसदीय सभागृहाचे सदस्य व राज्यसभेतील विरोधी पक्षनेते तसेच काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे हे ८ ऑगस्ट २०२६ रोजी विजय शंखनाद रॅलीच्या कार्यक्रमासाठी उत्तराखंड मधील हलदानी येथील रामलीला मैदानावर उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यानंतर जातीयवादी प्रवृत्तीच्या काही लोकांनी गोमूत्र शिंपडून मैदान पवित्र केल्याचा दावा केला आहे, ही कृती म्हणजे केवळ मल्लिकार्जुन खर्गे यांचाच नव्हे तर भारतीय संविधानाचा अवमान असल्याचे समितीने म्हटले आहे.या घटनेच्या निषेधार्थ गुरुवार, २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत डॉ. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

## नराधमाला कडक शिक्षा देण्यात यावी : चेअरमन सत्यशील शेरकर

शिवनेरी (स. गांवकरी) : पिंपळवंडी येथील एका निरागस १० वर्षाच्या मुलीवर झालेला अत्याचार आणि निर्धुन खुन काळिबां फासणारी घटना आहे . या गंभीर प्रकरणाचा जलद गतीने आणि पारदर्शक तपास करून न्यायालयीन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून त्या , नराधमाला कडक शिक्षा देण्यात यावी . अशी मागणी श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर यांनी केली. या कठीण प्रसंगी पीडित कुटुंबावर कोसळलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत . या कुटुंबाला अतिव दुखातून सावरण्याची शक्ती ईश्वर देव व या निष्पाप निरागस जीवाला चिरशांती लाभो.

# शेवगा पावडर प्रक्रिया युनिटचा भव्य शुभारंभ

- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते मौजे बोधडी (परिसर) येथे उद्घाटन;
- आदिवासी शेतकऱ्यांना मूल्यवर्धनातून आर्थिक स्थैर्याचा नवा मार्ग




नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

किनवट तालुक्यातील मौजे बोधडी (परिसर) येथे आदिवासी शेतकऱ्यांच्या शेवगा उत्पादनाला मूल्यवर्धनाची जोड देत उभारण्यात आलेल्या शेवगा प्रक्रिया युनिटचा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार, 17 ऑगस्ट रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते या प्रक्रिया युनिटचे उद्घाटन करण्यात आले. वनश्री आदिवासी शेतकरी उत्पादक गट बोधडी बु. यांच्याकडे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय किनवट, कृषी विभाग तसेच अती प्रभावित मेगा पाणलोट प्रकल्प महाराष्ट्र (HIMWP-MH) यांच्या समन्वयातून हा नावीन्यपूर्ण उपक्रम साकारण्यात आला आहे. आदिवासी व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना केवळ शेती उत्पादनावर अवलंबून न ठेवता त्यांच्या उत्पादनावर प्रक्रिया, मूल्यवर्धन, पॅकिंग व बाजारपेठेची जोड देऊन उत्पन्नाचे शाश्वत स्रोत निर्माण करण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण पाऊल मानला जात आहे.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीमालाचे उत्पादन वाढविण्याबरोबरच त्यावर स्थानिक पातळीवर प्रक्रिया करून त्याची बाजारातील किंमत वाढविणे गरजेचे आहे. हीच संकल्पना केंद्रस्थानी ठेवून नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनातून शेवगा प्रक्रिया युनिट उभारणीच्या उपक्रमाला चालना मिळाली. याच बरोबर 17 ऑगस्ट पासून सुरू असलेल्या 2 रेशीम प्रशिक्षण वर्ग मधील एकूण साधारण 60 रेशीम उत्पादक शेतकरी यांना कौशल्य विकास प्रशिक्षणाचा समारोप करण्यात आला व त्याप्रसंगी सर्व प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. HIMWP-MH प्रकल्पाच्या माध्यमातून शेती, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन, शेतकरी उत्पन्नवाढ आणि ग्रामीण उपजीविका बळकटीकरण यांना जोड देण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून शेवगा प्रक्रिया उद्योगाकडे पाहिले जात आहे. उद्घाटन सोहळ्यास डॉ. बी. सरवनन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी किनवट हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी कैलास जायभाये SBI RSETI संचालक नांदेड, डॉ. अशोक वडवळे जिल्हा रेशीम अधिकारी, विक्रांत देहानकर B.R.L.F. राज्य समन्वयक नागपूर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच तहसीलदार श्रीमती डॉ. शारदा चोंडेकर, बाबुराव सोनेकांबळे एल.डी.एम. एस.बी. आय. नांदेड, श्रीमती जयश्री वाघमारे गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट, प्रदीप नाईक सहाय्यक प्रकल्प अधिकारी, चंद्रकांत निमोड तालुका कृषी अधिकारी किनवट, तुषार पाटील प्रकल्प संचालक RAES शाखा किनवट आदी मान्यवर उपस्थित होते. शेवगा पावडर प्रक्रिया युनिट हे केवळ एक प्रक्रिया केंद्र नसून शेतीपासून उद्योगाकडे आणि कच्च्या मालापासून मूल्यवर्धित उत्पादनाकडे जाणाऱ्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे एक प्रभावी मॉडेल म्हणून विकसित करण्याची संधी आहे. शेतकरी उत्पादक गटाच्या माध्यमातून सामूहिक पद्धतीने उत्पादन, प्रक्रिया, पॅकिंग, ब्रँडिंग आणि बाजारपेठ व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात सकारात्मक वाढ होऊ शकते. विशेषतः आदिवासी भागातील शेतकरी, महिला आणि युवकांना स्थानिक पातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या उपक्रमाला विशेष महत्त्व आहे. बोधडी परिसरातील शेवगा पावडर प्रक्रिया युनिटचा शुभारंभ हा किनवटच्या कृषी व ग्रामीण विकासाच्या वाटचालीतील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.



## ‘मावशी’ व ‘दाई’ यांचा अमनोरा येस फाउंडेशनतर्फे सन्मान

पुणे : (स. गांवकरी)

ससून रुग्णालयात रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. या सेवेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या ‘मावशी’ आणि ‘दाई’ यांचा सन्मान होणे अत्यंत योग्य आहे, असे प्रतिपादन बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी केले. अमनोरा येस फाउंडेशन (सिटी ग्रुप) यांच्या वतीने ससून रुग्णालयातील मावशी व दाईंना स्व. मीरा देशपांडे सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी डॉ. पवार बोलत होते. कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. यल्लाप्पा जाधव, सिटी ग्रुपचे मुख्य सामाजिक अधिकारी विवेक कुलकर्णी, तसेच बी. जे. मेडिकल कॉलेज व ससून रुग्णालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. या पुरस्काराचे स्वरूप ₹११,००० रोख रक्कम, साडी, शाल व सन्मानचिन्ह असे होते. ससून रुग्णालयातील श्रीमती गंगुबाई धोंडीबा दळवी, श्रीमती रुमिला रवी शिंदे, श्रीमती शैला सुरेश सैद, श्रीमती सुनीता रविंद्र कांबळे, श्रीमती गौरी रविंद्र गोहीरे आणि श्रीमती सुनीता कैलास गायकवाड यांचा त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी सन्मान करण्यात आला.

## सत्ता-पक्षांचे विरोधक राष्ट्रद्रोही नव्हे, तर राष्ट्रहितैषी : गोपाळ तिवारी

### सत्ताधाऱ्यांच्या दोषांवर बोट ठेवणाऱ्यांना ‘दिमागी नक्षल’ म्हणणे ही सत्तालोलुप स्वार्थी मानसिकता

पुणे : (स. गांवकरी)




सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणारे, त्यांच्या दोषांवर बोट ठेवणारे आणि देशातील विद्यार्थी, तरुण, शेतकरी व छोट्या उद्योजकांच्या प्रश्नांसाठी आवाज उठवणारे नागरिक राष्ट्रद्रोही नसून राष्ट्रहितैषी आहेत. अशा व्यक्तींना ‘दिमागी नक्षल’ म्हणून संबोधणे ही सत्तालोलुप आणि स्वार्थी मानसिकतेचे द्योतक आहे, अशी टीका महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली. भारत ही लोकशाहीची जननी असल्याचा जगभर डंका पिटणारे भाजपचे शीर्ष नेतृत्व किती दुटप्पी, स्वार्थी आणि ढोंगी आहे, हे पंतप्रधानांच्या अलीकडील वक्तव्यांवरून स्पष्ट झाले आहे. देशातील विद्यार्थी व तरुणांच्या भवितव्याचा तसेच देशहिताचा विचार करणारे राजकीय नेते, नागरी समाजातील सदस्य आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी कार्यरत सामाजिक चळवळींतील घटक सत्ताधाऱ्यांना नकोसे झाले आहेत. अशा सर्वांना ‘दिमागी नक्षल’ म्हणून हिणवणे हा लाल किल्ल्यावरून लोकशाहीवर केलेला आघात आहे, असे तिवारी यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा आणि घटनात्मक पदाची गरिमा जपण्याची जबाबदारी असताना विरोधी विचार मांडणाऱ्यांना अशा प्रकारे हिणवले जाईल, असे वाटले नव्हते, असेही तिवारी यांनी नमूद केले. केवळ निवडणूककेंद्री राजकारण आणि सत्ताप्राप्तीवर भर देऊन लोकशाहीतील स्वायत्त संस्थांचा वापर केला जात असल्याने विद्यार्थी, तरुण, शेतकरी आणि छोट्या उद्योजकांच्या हितासाठी विविध स्तरांवर आवाज उठवला जात आहे. हीच लोकशाहीची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

“मोदींच्या व्याख्येनुसार ‘दिमागी नक्षल’ नक्की कोण?” असा सवाल उपस्थित करत तिवारी म्हणाले की, नक्षलवाद हा हिंसक आणि राष्ट्रविरोधी प्रवृत्तीशी संबंधित आहे. मात्र घटनात्मक चौकटीत राहून सरकारला प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांना त्याच चौकटीत बसवणे चुकीचे आहे. सत्तालोलुपतेतून लोकशाहीवर हुकूमशाहीचे सावट आणण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

सत्ताधाऱ्यांना प्रश्न न विचारणारे, अन्यायाविरोधात आवाज न उठवणारे आणि गप्प बसणारे नागरिकच अपेक्षित आहेत का, असा सवालही तिवारी यांनी केला. भारतात लोकशाही आहे आणि प्रत्येक नागरिकाला स्वतंत्र विचार करण्याचा तसेच संविधानाच्या चौकटीत आपले मत मांडण्याचा अधिकार आहे, हे सत्ताधाऱ्यांनी विसरू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधानांनी संसद भवनाच्या पायरीवर नतमस्तक होऊन संसदीय लोकशाहीबद्दल आदर व्यक्त केला; मात्र संसदेसमोर घटनात्मक उत्तरदायित्व पार पाडण्याच्या मुद्द्यावर विरोधकांकडून सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत. संविधानासमोर नतमस्तक होण्याबरोबरच संविधानातील मूल्यांचे रक्षण करणेही तितकेच आवश्यक आहे. नागरिकांना केंद्रबिंदू मानत असल्याचे सांगताना त्यांच्या घटनात्मक अधिकारांवर दबाव आणण्याचा प्रयत्न होणे ही गंभीर बाब असल्याचे तिवारी यांनी म्हटले.

## पिंपळवंडीत मुलीच्या हत्येने खळबळ

### संशयित तरुणाला अटक

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)




आरोपी पांग्या उर्फ साहिल खैरे

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे दहा वर्षांच्या मुलीचा लैंगिक अत्याचारा नंतर खून झाल्याची अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे.या प्रकरणी शेजारी राहणाऱ्या २५ वर्षीय संशयित आरोपीलाआळेफाटा पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पिंपळवंडी येथील योगेश पवार यांची चौथी इयत्तेत शिकणारी मुलगी आजारी असल्याने मंगळवारी शाळेत गेली नव्हती दुपारच्या सुमारास पालक घराबाहेर असताना ती घरातून बेपत्ता झाली. नातेवाईक व ग्रामस्थांनी परिसरात शोध घेतला;मात्र ठावठिकाणा न लागल्याने आळेफाटा पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद करण्यात आली. पोलिसांकडून मुलीचा शोध सुरू असताना शेजारील संशयित तरुणहीशोधमोहीमेत सहभागी असल्याचे भासवत होता.मात्र,त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली चौकशीत त्याच्याकडूनमहत्त्वाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. आरोपीने दिलेल्या माहितीनुसार 'लेंडे स्थळ' परिसरातील एका ओढ्या जवळ झाडाशेजारी मुलीचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे.फॉरेन्सिक पथकानेही घटनास्थळाची पाहणी करून पुरावे संकलित केले. घटनेची माहिती मिळताच पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप गिल, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील आणि पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला. दरम्यान,या गंभीर प्रकरणाचा तपास जलदगतीने पूर्ण करून आरोपीविरोधात कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करावी,तसेच खटला जलदगती न्यायालयात चालवावा,अशी मागणी ग्रामस्थ व नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

## आणखी एक भोंदूगिरीचा प्रकार!

पुणे : (स. गांवकरी)

सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आणि मोटिवेशनल स्पीकर असल्याचे भासवून एका २३ वर्षीय युवकाने एका तरुणीकडे भीती दाखवून अर्धनग्न फोटो मागितल्या प्रकरणी कोंढवा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. आरोपीचे नाव दिव्य जितेंद्र परमार असून त्याने स्वतःला आध्यात्मिक गुरू म्हणवत होता.२२ वर्षीय तरुणीने कोंढवा पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, परमारने महाविद्यालयात व्यवसायिक अभ्यासक्रम घेत असतानाच मोटिवेशनल स्पीकर म्हणून स्वतःचा प्रचार सुरू केला. वयाच्या १८ व्या वर्षीच त्याने ठिकठिकाणी भाषणे देण्यास सुरुवात केली. नंतर त्याने सोशल मीडियावर स्वतःचे चॅनेल सुरू करून फॉलोअर्स तयार केले आणि शुल्क आकारून व्याख्याने देऊ लागला. काही काळानंतर त्याने स्वतःला आध्यात्मिक गुरू म्हणून घोषित केले.

## अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांचा प्रेरणादायी निर्णय

श्रीरामपूर : (स. गांवकरी)



काही दुःखं आयुष्यभर मनात घर करून राहतात; मात्र त्याच दुःखातून एखाद्याच्या आयुष्यात आनंद निर्माण करण्याची ताकद मिळाली, तर त्यातून माणुसकीची खरी ओळख निर्माण होते. श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी आपल्या कृतीतून माणुसकीचा असाच प्रेरणादायी आदर्श समाजासमोर ठेवला आहे.

भुसावळ येथे कार्यरत असताना वाघचौरे यांच्या अवघ्या १२ दिवसांच्या चिमुकल्या मुलीचे, अवनीचे, गंभीर आजारामुळे निधन झाले. आपल्या लेकीला गमावण्याचा हा आघात त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत वेदनादायी होता. मात्र या दुःखाने खचून न जाता त्यांनी एका अनाथ मुलीला आपल्या कुटुंबाचा आधार देण्याचा निर्णय घेतला. शासकीय CARA प्रक्रियेद्वारे त्यांनी एका अनाथ मुलीला दत्तक घेतले. विशेष म्हणजे, या मुलीचे नावही त्यांनी ‘अवनी’ असेच ठेवले. आपल्या आयुष्यातून निघून गेलेल्या लेकीची आठवण त्यांनी एका नव्या आयुष्याच्या रूपाने जपली. मिळालेल्या माहितीनुसार, वाघचौरे यांनी आपल्या संपत्तीतील तब्बल अर्धा हिस्सा या मुलीच्या नावे करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय केवळ संपत्तीचा वारसा देण्यापुरता मर्यादित नसून, तिच्या सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि उज्ज्वल भविष्यासाठी उचललेले मोठे पाऊल आहे. एका मुलीला गमावण्याचे दुःख मनात असतानाही दुसऱ्या एका मुलीला प्रेम, कुटुंब आणि सुरक्षित भविष्य देण्याचा निर्णय घेणे ही निश्चितच मोठी गोष्ट आहे. रक्ताच्या नात्यापेक्षा माणुसकीचे नाते किती मोठे असते, हे वाघचौरे यांच्या या कृतीतून अधोरेखित होते.

## जवळके येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास सुरूवात

कोपरगांव : (स. गांवकरी)



सर्व भाविक भक्तांना कळविण्यात आनंद होतो की सालाबादप्रमाणे याही वर्षी आनंद कोटी ब्रम्हांडनायक पंढरी पांडुरंगाच्या कृपेने, योगीराज सद्गुरु गंगागिरीजी महाराज यांच्या आशीर्वादाने व गुरुवर्य श्रीपाद महाराज माऊली यांच्या आशीर्वादाने तसेच महंत रामगिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने व समस्त ग्रामस्थ जवळके यांच्या मार्गदर्शनाने चालत आलेला अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास मंगळवार दिनांक 18 ऑगस्ट रोजी सप्ताह सोहळ्यास प्रारंभ झाला आहे या सप्ताहात कालावधी दररोज विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत आलेले आहे. या काळात राज्यभरातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तन सेवा सप्ताह कालावधीत संपन्न होणार आहे यामध्ये 18/8 ऑगस्ट रोजी ह.भ.प. मयुर महाराज पाचोरे ( बहादरबाद ) ,19 ऑगस्ट रोजी ह.भ.प. प्रा. गोरख महाराज जगताप ( शिंदेवाडी ) 20ऑगस्ट रोजी ह.भ.प. विलास महाराज मदने, 21 ऑगस्ट रोजी ह.भ.प.अरूण महाराज दिघे ( तळेगाव ) 22 ऑगस्ट रोजी ह.भ.प. प्रतिक्षाताई जाधव ( शिर्डी ) , 23ऑगस्ट रोजी ह.भ.प. शिवाजी महाराज तळेकर , 24 ऑगस्ट काशिकानंदजी महाराज परमहंस तसेच 25 ऑगस्ट रोजी ह.भ.प. स्वरुपानंदगिरी महाराज (मुक्ताई ज्ञानपीठ पुणतांबा) यांचे काल्याचे किर्तन सकाळी 11 ते 1 होईल.

## नगर मनमाड आणि ट्रम्प विधानावर डॉ सुजय विखे पाटील ठाम !

### विरोधकांना थेट प्रत्युत्तर, पुराव्यांसह मांडली भूमिका : दारूबाबतच्या वक्तव्याचा विपर्यास झाल्याने ते मागे घेतो : सुजय विखे

शिर्डी : (स. गांवकरी)



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर मी ठाम आहे. अभ्यासू पणे केलेले हे वक्तव्य विरोधकांना न समजल्याने व तेवढा अभ्यास त्यांचा नसल्याने राजकीय पोळी भाजण्यासाठी ते रान उठवत आहे या प्रश्नावर मला विरोधकांना उत्तर देण्याची गरज नाही परंतु जनतेला उत्तर देणे माझे दायित्व आहे.

रस्त्याच्या कामांना युद्धजन्य परिस्थिती व डोनाल्ड ट्रम्प हेच जबाबदार असल्याचे वक्तव्यावर मी आजही ठाम असल्याचा पुनर्रचार करत दारू पिणाऱ्यांची संख्या वाढली हे वक्तव्य मी मार्मिक व मिश्किल पणे केले होते याचा अर्थ काहींनी वेगळा काढला आहे हे मिस्कील वक्तव्य मी मागे घेत असल्याचे भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले भारतीय जनता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष माजी खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील यांनी शिर्डी येथे पत्रकार परिषद आयोजित केली होती या पत्रकार परिषदेत शिर्डी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा जयश्रीताई थोरात प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते राजेंद्र गोंदकर यांच्यासह नगर परिषदेच्या नगरसेविका व नगरसेवक उपस्थित होते याप्रसंगी बोलताना डॉ सुजय विखे पाटील म्हणाले की

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कार्यपद्धतीमुळे युद्ध लादल्याने डांबराची उपलब्धता व आयात कमी झाली डांबर आयातीवर संकट आले त्यामुळे देशातील अनेक रस्त्यांची कामे थांबली त्यात अहील्यानगर मनमाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुद्धा संथ गतीने होत आहेत.

अमेरिकेच्या युद्ध धोरणामुळे पश्चिम आशियातून डांबराचा पुरवठा घटला, दर वाढले आणि त्याचा परिणाम देशातील रस्त्यांच्या कामांवर झाला,’ या आपल्या आधीच्या वक्तव्यावर माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील ठाम राहिले आहेत.

‘मी प्रत्येक वाक्य पूर्ण अभ्यास करून बोलतो. माझ्या वक्तव्याला अधिकृत आकडेवारी, शासकीय पत्रे आणि परदेशी व भारतातील विविध वृत्तपत्रांतील वृत्तांचे आधार आहेत.

त्यामुळे मी माझ्या भूमिकेवर ठाम आहे,’ असे त्यांनी स्पष्ट केले. नगर-मनमाड रस्त्याच्या रखडलेल्या कामावरून विरोधकांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना त्यांनी आक्रमक भूमिका मांडली.

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ४ । वर्ष : ४ थे । अंक : २४७। किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार दि. २० ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## आधार प्रमाणीकरणापूर्वी मृत पावलेल्या शेतकऱ्यांच्या वारसांनाही कर्जमुक्तीचा लाभ

### राज्य सरकारचा निर्णय; 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेसाठी मानक कार्यप्रणाली जाहीर

मुंबई (समर्थ गांवकरी)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या, मात्र आधार प्रमाणीकरणापूर्वी मृत्यू झालेल्या शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांबाबत शासनाने मानक कार्यप्रणाली निश्चित केली आहे. संबंधित मयत शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांवर वारसांची नोंद करून, त्यांची माहिती योजनेच्या पोर्टलवर अपलोड करण्यात येणार असून, पात्र वारसांना योजनेच्या निकषांनुसार कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे.

राज्य शासनाने २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे ही योजना सुरू केली आहे. योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन प्रणालीद्वारे करण्यात येत असून महाआयटीमार्फत १६.९६ लाख पात्र लाभार्थ्यांची पहिली यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यापैकी १३.४८ लाख लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले असून उर्वरित लाभार्थ्यांचे प्रमाणीकरण सुरू आहे. पहिल्या यादीतील काही शेतकरी आधार प्रमाणीकरणापूर्वीच मयत झाल्याचे बँकांच्या निदर्शनास आले आहे. शासन निर्णयानुसार आधार प्रमाणीकरणाशिवाय कर्जमुक्तीचा लाभ देता येत नसल्याने अशा कर्जखात्यांसाठी वारस नोंद करून सुधारित माहिती योजना पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली आहे.

संबंधित कर्जदार शेतकरी मयत झाल्याची माहिती वारसाकडून प्राप्त झाल्यानंतर बँकेने आपल्या प्रचलित धोरणानुसार कर्जखात्यावर वारसांची नोंद करावी. त्यानंतर योजनेच्या पोर्टलवरील सुविधेद्वारे वारसांची माहिती अपलोड करावी. वारसांचे कर्जखात्यातील हिस्सेही नमूद करावे लागणार आहेत. वारसाचे नाव, आधार क्रमांक, जन्मतारीख, लिंग, मोबाईल क्रमांक, ॲग्रीस्टॅक नोंदणी, सीआयएफ, बचत खाते क्रमांक, कर्ज खाते क्रमांक आणि कर्जातील वारसाचा हिस्सा आदी माहिती ऑनलाइन अपलोड करावी लागणार आहे.

मयत शेतकऱ्याशी संबंधित पूर्वीचा बीआर-आयडी आणि पूर्वीचा कर्ज खाते क्रमांक यासह संबंधित माहिती एकाच फाईलमध्ये अपलोड करण्याच्या सूचना बँकांना देण्यात आल्या आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कर्जखात्यांची माहिती अपलोड करण्यापूर्वी संबंधित शासकीय लेखापरीक्षकामार्फत तपासणी करणे आवश्यक राहणार आहे.

प्रत्येक वारसाचे आधार प्रमाणीकरण आवश्यक

– बँकांनी अपलोड केलेल्या कर्जखात्यांच्या माहितीचे महाआयटीमार्फत योजनेच्या निकषांनुसार संस्करण करण्यात येईल. त्यानंतर पात्र कर्जखात्यांची यादी विशिष्ट क्रमांकासह नव्याने प्रसिद्ध करून आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. योजनेच्या निकषांनुसार प्रत्येक वारसाचे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक राहणार आहे. तसेच आधार प्रमाणीकरणापूर्वी किंवा प्रमाणीकरणाच्या वेळी ॲग्रीस्टॅक नोंदणी अथवा फार्मर आयडी असणे बंधनकारक राहणार आहे. – एका मयत शेतकऱ्याच्या कर्जखात्यास एकापेक्षा अधिक वारस असल्यास, योजनेच्या निकषांनुसार कर्ज रकमेतील त्यांच्या हिस्स्याच्या प्रमाणात कर्जमुक्तीची रक्कम कर्जखात्यात वर्ग केली जाईल. मात्र, योजनेच्या निकषांनुसार एखादा वारस अपात्र ठरल्यास त्याला कर्जमुक्तीचा लाभ मिळणार नाही.



## रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी बोलता न आल्यास 'बॅज' निलंबित करणार

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक; २० ऑगस्टपासून राज्यभरात अंमलबजावणी

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे अनिवार्य असून, या नियमाची अंमलबजावणी २० ऑगस्टपासून करण्यात येणार आहे. मराठीचे व्यावहारिक ज्ञान नसलेल्या चालकांना प्रथम एक महिन्याची नोटीस देण्यात येईल. या कालावधीत मराठीचे ज्ञान प्राप्त न केल्यास त्यांचा बॅज तीन महिन्यांपर्यंत निलंबित करण्यात येईल. त्यानंतरही मराठी शिकण्यास जाणीवपूर्वक नकार दिल्यास बॅज व परवाना रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील रिक्षा-टॅक्सी चालकांसाठी कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघाच्या वतीने गेल्या १०५ दिवसांपासून 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' राबविण्यात आले. या अभियानाला सुमारे १ लाख ६५ हजार ६०० अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी प्रतिसाद देत मराठीचे प्रशिक्षण घेतले. ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये पद्मश्री, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत सहभागी चालकांना प्रमाणपत्रे देण्यात आली. या सर्व चालकांचे परिवहन मंत्री म्हणून सरनाईक यांनी अभिनंदन केले.

राज्यात १९८९ पासून असलेल्या नियमाच्या आधारे रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी व्यावहारिक मराठीचे ज्ञान आवश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी करण्यात आलेल्या संबंधित कायदेशीर तरतुदीनुसार आता या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले. महाराष्ट्रात देशाच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांना रोजगार मिळावा, ही शासनाची भूमिका आहे. मुंबईने नेहमीच देशभरातील नागरिकांना सामावून घेतले आहे. मात्र, महाराष्ट्राच्या भाषा आणि संस्कृतीचा अभिमान राखणेही तितकेच आवश्यक आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठीचा प्रचार, प्रसार आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.



## महाराष्ट्रात 'एसआयआर'च्या वेळापत्रकात बदल

### केंद्रीय निवडणूक आयोगाचा निर्णय; प्रारूप यादी आता ३१ ऑगस्टला प्रसिद्ध होणार

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील मतदारयाद्यांच्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (एसआयआर) कार्यक्रमाच्या वेळापत्रकात केंद्रीय निवडणूक आयोगाने बदल केले आहेत. नवीन आदेशानुसार, आता राज्यातील मतदारयाद्यांची प्रारूप (ड्राफ्ट) प्रसिद्धी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी केली जाणार आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाचे यासंदर्भातील पत्र १९ ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना प्राप्त झाले आहे. या पत्रानुसार, पुनरीक्षण मोहिमेच्या टप्प्यांचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सुधारित वेळापत्रकानुसार, २४ ऑगस्ट २०२६ रोजी मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना करण्याचे काम पूर्ण केले जाईल. त्यानंतर, ३१ ऑगस्ट रोजी मतदारयाद्यांची प्रारूप प्रसिद्धी केली जाईल. प्रारूप यादी प्रसिद्ध झाल्यानंतर ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना मतदारयादीतील नोंदींवर दावे आणि हरकती दाखल करता येणार आहेत. त्यानंतर ३१ ऑगस्ट ते २९ ऑक्टोबर या काळात नोटीस टप्पा आणि दाखल दावे-हरकतींवर निर्णय व सुनावणीची प्रक्रिया पार पडेल. या संपूर्ण प्रक्रियेनंतर, ४ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदारयादी जाहीर केली जाणार आहे. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार, सर्व संबंधित यंत्रणांना या बदलाची अंमलबजावणी तातडीने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, या सुधारित वेळापत्रकाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासोबतच, राज्यातील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनाही या बदलाबाबत लेखी स्वरूपात अवगत करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी आणि प्रशासनाला देण्यात आले आहेत.

## अकोले महाविद्यालयाच्या नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रास पुस्तके भेट

### कक्ष अधिकारी सोपान आरोटे यांचे विधायक पाऊल

अकोले (समर्थ गांवकरी)

येथील अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी मंत्रालयातील सहकार विभागाचे कक्ष अधिकारी सोपान आरोटे यांनी त्यांच्या संग्रहातील, सुमारे दोनशेहून अधिक पुस्तके भेट दिली. ही पुस्तके विविध स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आहेत.

सोपान आरोटे हे सन २०२१ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे घेण्यात येणारी राज्यसेवा परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत. स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना त्यांनी त्यासाठी लागणारी विविध संदर्भ पुस्तके विकत घेतली होती. त्या पुस्तकांचा त्यांना उपयोग झाला व मोठे यश मिळाले. त्यांनी काही काळ महाविद्यालयातील नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्रामध्ये अभ्यास केला होता. महाविद्यालयाप्रती, केंद्राप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी आरोटे यांनी हे विधायक पाऊल उचलले.

'२०११ मध्ये सुरू झालेले महाविद्यालयाचे नालंदा स्पर्धा परीक्षा अभ्यास केंद्र हा महाविद्यालयाचा मानबिंदू आहे. आत्तापर्यंत अनेक विद्यार्थी येथे अभ्यास करून विविध परीक्षा उत्तीर्ण झाले व आज विविध पदांवर यशस्वीरित्या कार्यरत आहेत. सध्या अभ्यास करत असणाऱ्या विद्यार्थ्यांना ही पुस्तके सहाय्यभूत ठरतील व चांगले यश ते मिळवतील', असा आशावाद महाविद्यालयाचे



प्राचार्य प्रा. डॉ. शिवाजी खेमनर यांनी यावेळी व्यक्त केला.

याप्रसंगी नालंदाचे समन्वयक प्रा. संदेश कासार, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सुनील मोहटे, प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. सुरेखा आरोटे, प्रा. किरण कानवडे, प्रा. किर्ती गुंजाळ आदी उपस्थित होते.

## शिष्यवृत्ती परीक्षेत सह्याद्री विद्यालयाची तालुक्यात बाजी

संगमनेर (समर्थ गांवकरी)

शिक्षण विभागाने घेतलेल्या इयत्ता पाचवी, इयत्ता सातवी व इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री विद्यालयाने उज्वल यश मिळवून तालुक्यात बाजी मारली असल्याची माहिती मुख्याध्यापक एस एम खेमनर यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना ते म्हणाले कि, माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व मा आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह्याद्री विद्यालयाने गुणवत्तेत आपला अग्रक्रम कायम राखला आहे.सह्याद्री विद्यालयाचे इयत्ता आठवीचे ९ विद्यार्थी, इयत्ता पाचवी मध्ये ६ विद्यार्थी तर इयत्ता सातवी मध्ये ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र ठरले. असे एकूण २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र होऊन गुणवत्ता यादीत आले.

कुटे साईशा बाबासाहेब २५० गुण, गंभीरे उत्कर्ष गणपत २५० गुण ,सानप विवेक वेरुनाथ २४४ गुण, वर्पे कार्तिकी विलास २४२ ,गुण आहेर ज्ञानेश्वरी राम २२० गुण ,ढाकणे प्रतीक नानासाहेब २२० गुण, वाकचौरे योगेश यश योगेश २१८ गुण, थोरात सायरा संतोष २१६ गुण, आभारी संस्कृती बाळासाहेब २१४ गुण मिळवले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना श्री वीरेश नवले सर यांनी मार्गदर्शन केले. तर इयत्ता सातवीचे पवार सर्वेस प्रल्हाद २६६ गुण, कडलग आयुष संजय २४६ गुण, खेमनर हर्षवर्धन सुभाष २४६ गुण, वाकचौरे अर्णव अनिल २४४ गुण ,हासे अद्वैत भारत २४० गुण, हिरे खुषी गणपत २३० गुण, सरोदे कौस्तुभ गणेश २२० गुण , या यशस्वी विद्यार्थ्यांना श्रीमती माळी सरला मॅडम , वायाळ मयुरी मयुरी मॅडम ,पठारे सोनाली मॅडम व मोहिते आरती मॅडम यांनी मार्गदर्शन केले. इयत्ता पाचवी चे सानप चेतना वेणूनाथ २३० गुण, खाडे हेरंब एकनाथ २२८ गुण, महाले श्लोक मनोज २२४ गुण, पचपिंड आयुष्य योगेश २०६ गुण, उगले रोहिणी विलास २०६ गुण, या यशस्वी विद्यार्थ्यांना श्री शरद नवले सर व अजीम शेख सर यांनी

## पत्रकार सुरेश वाणी यांना कथित धमकीप्रकरणी चौकशीची मागणी

रायगड (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील अजनावळे येथे पत्रकार सुरेश वाणी यांच्याशी आमदार शरद सोनवणे यांनी कथितरीत्या अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून धमकी दिल्याच्या घटनेची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, रायगड जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच पुणे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

अजनावळे येथील आश्रमशाळेत अदानी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांची बैठक सुरू असताना पत्रकार सुरेश वाणी हे पत्रकार म्हणून बैठकीचे वार्तांकन करण्यासाठी उपस्थित होते. यावेळी किल्ले शिवनेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शरद सोनवणे यांनी वाणी यांच्याशी अर्वाच्च भाषेत वक्तव्य करून, १५ ऑगस्ट होऊ द्या... माझ्यावर याआधी भरपूर गुन्हे आहेत. वाणी, तुमच्याकडे बघून घेतो, अशा आशयाची धमकी दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

तसेच पत्रकारांविषयी पत्रकारांचे धंदे झाले आहेत, अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा आरोप असून, या प्रकारामुळे पत्रकारांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

लोकशाही व्यवस्थेत पत्रकार हा जनतेच्या समस्या, प्रश्न आणि अन्याय शासन व प्रशासनापर्यंत पोहोचविणारा महत्त्वाचा दुवा आहे. लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारणे, जनतेच्या समस्या मांडणे आणि वस्तुस्थिती समाजासमोर आणणे ही पत्रकारांची लोकशाहीतील महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे पत्रकारांना धमकावणे अथवा त्यांच्या कार्यात अडथळा आणण्याचा कोणताही प्रकार गंभीरपणे घेतला पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने मांडली.

या कथित घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने तीव्र व जाहीर निषेध करण्यात आला असून, घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास संबंधितांवर कायद्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पत्रकारांचा आवाज दाबण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही, असेही संघटनेने स्पष्ट केले.



दरम्यान, पत्रकारांच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि सुरक्षिततेच्या संरक्षणासाठी सरकार पत्रकारांच्या पाठीशी राहील, असे आश्वासन रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे कोकण विभागीय अध्यक्ष राकेश खराडे, कोकण विभाग प्रदेश उपाध्यक्ष शैलेश पालकर, राहुल जाधव, अर्जुन कदम, प्रसाद अटक, संतोष घरटकर, सुरेश शिंदे, किरण बांधणकर, प्रशांत पोतदार, किरण मोरे, सुधीर पांढरे, सुरेश पंधेरे यांच्यासह रायगड जिल्ह्यातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'उमेद' मॉलला मंजुरी

### मंत्री नितेश राणे यांची माहिती; गणेशोत्सवाआधी जिल्ह्यातील सर्व रस्ते सुस्थितीत करण्याची पालकमंत्र्यांची ताकीद

मुंबई (समर्थ गांवकरी)



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी 'उमेद' मॉल उभारण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला पालकमंत्री नितेश राणे यांनी मंजुरी दिली आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि पर्यटनाला चालना देण्यासाठी मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी पुढाकार घेतला असून, त्यांनी बुधवारी मंत्रालयात विविध विभागांच्या आढावा बैठका घेऊन विकासकामांना गती दिली. आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चाकरमान्यांच्या प्रवासात अडथळा येऊ नये म्हणून जिल्ह्यातील सर्व खराब रस्ते तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

मंत्रालयात झालेल्या बैठकीत पालकमंत्री नितेश राणे यांनी सिंधुदुर्गच्या भौगोलिक आणि लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेऊन 'उमेद' मॉल प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे आदेश दिले. या मॉलमुळे स्थानिक उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी मत्स्यआयुक्त प्रेरणा देशभ्रतार, जिल्हाधिकारी तृप्ती धोडमिसे आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या जीर्ण झालेल्या इमारतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी नवीन इमारत उभारण्याचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचेही निर्देश देण्यात आले.

# सर्पदंश अधिसूचित आजार घोषित;आमदार पाचपुतेंच्या पाठपुराव्याला यश

## मुख्यमंत्री फडणवीस व आरोग्यमंत्री आबिटकर यांचे आमदार पाचपुते यांनी मानले आभार



श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

राज्यातील सर्पदंशाच्या प्रत्येक घटनेची शास्त्रशुद्ध नोंद व्हावी, सर्पदंशामुळे होणारे मृत्यू व अपंगत्व कमी व्हावे आणि रुग्णांना वेळेत योग्य उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने सर्पदंशाला 'अधिसूचित आजार' (छेींळषळरलश्रश उळीशरीश) म्हणून घोषित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आमदार विक्रम पाचपुते यांनी या निर्णयाचे स्वागत करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे विशेष आभार मानले.

विधानसभेत मांडलेल्या मागणीला यश

सर्पदंशाचा प्रश्न केवळ मृत्यूच्या आकडेवारीपुरता मर्यादित न ठेवता राज्यातील प्रत्येक सर्पदंशाची नोंद होणे आवश्यक आहे, अशी मागणी आमदार विक्रम पाचपुते यांनी ३० जून २०२६ रोजी महाराष्ट्र विधानसभेत केली होती. सर्पदंशाच्या वास्तविक घटना, विषबाधेचे स्वरूप, रुग्णांना देण्यात आलेले पींळ–डपरज्ञश तशपो (ASV), उपचारानंतर होणारे दुष्परिणाम, अपंगत्व तसेच दीर्घकालीन आरोग्य परिणामांची व्यापक माहिती उपलब्ध होण्याची गरज त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती.

या मागणीवर आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक भूमिका घेत कार्यवाहीचे आश्वासन दिले होते. त्यानंतर आमदार पाचपुते यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आता शासनाच्या निर्णयामुळे यश मिळाले आहे.

प्रत्येक सर्पदंशाची नोंद होणार

नवीन निर्णयानुसार शासकीय व खासगी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये आणि वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या निदर्शनास आलेल्या संशयित, संभाव्य किंवा निश्चित सर्पदंशाच्या घटनांची तसेच सर्पदंशामुळे झालेल्या मृत्यूंची नोंद संबंधित आरोग्य प्राधिकरणाकडे करणे बंधनकारक राहणार आहे.

सर्पदंशाचे ठिकाण व तारीख, विषबाधेची लक्षणे, करण्यात आलेले उपचार, देण्यात आलेल्या ASV कुप्यांची संख्या, रुग्णाला अन्य रुग्णालयात हलविण्यात आले असल्यास त्याचा तपशील आणि उपचाराचा अंतिम परिणाम अशा महत्त्वाच्या बाबींची नोंद केली जाणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्पदंशाची वास्तविक परिस्थिती समजण्यासाठी अधिक विश्वासार्ह डेटाबेस निर्माण होण्यास मदत होणार आहे.

सर्पदंशाचे 'हॉटस्पॉट' शोधण्यास मदत

HMIS/DHIS-2, IDSP किंवा शासनाने निश्चित केलेल्या अन्य प्रणालीद्वारे माहिती संकलित झाल्याने कोणत्या जिल्ह्यात, तालुक्यात किंवा भागात सर्पदंशाचे प्रमाण अधिक आहे, कोणत्या हंगामात घटना वाढतात, उपचारांची उपलब्धता कुठे कमी आहे आणि ASV ची आवश्यकता कुठे अधिक आहे, याचे प्रभावी विश्लेषण करता येणार आहे.

या माहितीच्या आधारे ASV चा साठा व वितरण अधिक शास्त्रीय पद्धतीने करता येईल. तसेच सर्पदंश प्रतिबंधक उपाययोजना आणि जनजागृती मोहिमा अधिक प्रभावीपणे राबविण्यास मदत होणार आहे.

आता पुढील लक्ष्य हाफकिन संस्थेचे पुनरुज्जीवन

शासनाच्या निर्णयाचे स्वागत करताना आमदार विक्रम पाचपुते म्हणाले, सर्पदंशाला अधिसूचित आजार घोषित करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांचे मनःपूर्वक आभार मानतो. विधानसभेत उपस्थित केलेल्या या विषयावर शासनाने सकारात्मक निर्णय घेतल्यामुळे आता महाराष्ट्रातील सर्पदंशाची वास्तविक परिस्थिती अधिक स्पष्टपणे समोर येईल.

मात्र आपले काम इथेच संपत नाही. सर्पदंश प्रतिबंध, उपचार आणि संशोधनाच्या पुढील टप्प्यासाठी हाफकिन संस्थेचे पुनरुज्जीवन अत्यंत महत्त्वाचे आहे. nti-Snake तशपो क्षेत्रात हाफकिनला ऐतिहासिक अनुभव व संशोधनाची परंपरा आहे. या क्षमतेचा महाराष्ट्राने पुन्हा प्रभावीपणे उपयोग केला पाहिजे. त्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्रासाठी "Regional Venom Bank'ची संकल्पना

महाराष्ट्रासाठी "Regional Venom Bank' निर्माण करण्याच्या प्रक्रियेलाही चालना देणार असल्याचे आमदार पाचपुते यांनी सांगितले. महाराष्ट्राच्या विविध भौगोलिक भागांतील विषारी साप, त्यांच्या विषातील संभाव्य प्रादेशिक फरक आणि उपलब्ध पींळ–डपरज्ञश तशपो ची परिणामकारकता यांचा शास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यासाठी संबंधित विभाग व तज्ज्ञ संस्थांसोबत बैठका घेऊन Regional Venom Bank निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू करण्यासाठी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्पदंशाच्या अधिसूचनेमुळे निर्माण होणारा राज्यव्यापी डेटा आणि हाफकिनसारख्या संस्थेची संशोधन क्षमता यांची सांगड घातल्यास महाराष्ट्र सर्पदंश संशोधन, विष अभ्यास आणि प्रभावी nti-Snake तशपो व्यवस्थापनामध्ये देशाला दिशा देणारे राज्य ठरू शकते, असा विश्वास आमदार पाचपुते यांनी व्यक्त केला.

उपचारानंतरच्या परिणामांवरही संशोधनाची गरज

सर्पदंशानंतर रुग्णाचा जीव वाचविणे सर्वात महत्त्वाचे असले तरी त्यानंतर होणारे दीर्घकालीन परिणाम, अवयवांवरील परिणाम, अपंगत्व आणि पुनर्वसन याबाबतही व्यवस्थित माहिती संकलित होणे आवश्यक आहे. अधिसूचनेतून उपलब्ध होणाऱ्या डेटाच्या आधारे भविष्यात अशा रुग्णांचा वैज्ञानिक पद्धतीने पाठपुरावा करून post-snakebite complications आणि long-term outcomes यावर संशोधन करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उभारण्याचा पाठपुरावा करण्यात येईल, असे आमदार पाचपुते यांनी सांगितले.

**सर्पदंशाची केवळ नोंद करून थांबायचे नाही; त्या डेटाचा उपयोग जीव वाचवण्यासाठी, योग्य डत उपलब्ध करून देण्यासाठी आणि भविष्यात अधिक प्रभावी उपचार व संशोधनासाठी झाला पाहिजे. अधिसूचनेपासून संशोधनापर्यंत आणि संशोधनापासून प्रभावी उपचारापर्यंतची संपूर्ण व्यवस्था महाराष्ट्राने निर्माण केली पाहिजे.**

**–आमदार विक्रम दादा पाचपुते**

# मुंबईत सहकार महर्षी काष्टी संस्थेचा गौरव (राज्य आंबा उत्पादक संघाने उत्कृष्ट कार्याची घेतली दखल)

श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)

काष्टी: सहकार क्षेत्रात देशात आणि राज्यात अग्रगण्य असणाऱ्या सहकार महर्षी काष्टी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेच्या

पारदर्शक व विश्वासाने चाललेल्या उल्लेखनीय कार्याची महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाच्या वतीने दखल घेऊन

मुंबई येथील नॅशनल स्टॉक एक्सचेंज–NSE, बांद्रा येथे मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन आदरपूर्वक गौरव करण्यात आला.

दि .१३ रोजी मुंबई बांद्रा येथे महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे चेअरमन चंद्रकांत मोकळ, सोहन इंडस्ट्रीज लिमिटेडचे एमडी भारत तावरे, संचालक बी. के. गुप्ता, यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थित कार्यक्रम पार पडला.

यावेळी श्रीगोंदा तालुक्यातून गौरव सोहळ्यास सहकार महर्षी काष्टी सोसायटीचे चेअरमन राकेश कैलासराव पाचपुते संचालक मंडळातील ड. विठ्ठलराव काकडे, सर्जेराव पाचपुते, लक्ष्मण पाचपुते, रोहिदास सोनवणे, प्रा सुनील माने, दादा कोकाटे, संजय नलगे, पोपटराव पाचपुते, राहुल लहारे, सचिव गणेश पाचपुते व मॅनेजर नामदेव गावडे,श्रीनाथ पाचपुते यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे चेअरमन चंद्रकांत मोकळ, बी. के. गुप्ता, डॉ. पी. के. शुक्ला, डॉ. तीर्थकार पटनाईक , बी. नारायण तसेच उपस्थित अन्य मान्यवरांनी राज्यातील शेतकऱ्यांना शेतकरी हिताचे मार्गदर्शन केले.

यावेळी सत्कारला उत्तर देताना सहकार महर्षी संस्थेचे अध्यक्ष राकेश पाचपुते यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या कार्याची दखल घेऊन सन्मान केल्याबद्दल तसेच महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे विशेष आभार व्यक्त केले. मिळालेला हा सन्मान सहकार महर्षी काष्टी सोसायटीच्या पुढील वाटचालीसाठी प्रेरणादायी असून, भविष्यातही शेतकरी व सभासदांच्या हितासाठी अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प पाचपुते यांनी व्यक्त केला.



महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे चंद्रकांत मोकळ, भारत तावरे, डॉ. उमाकांत दांगट, बी. के. गुप्ता, डॉ.पी.के.शुक्ला, डॉ. तीर्थकार पटनाईक, बी नारायण, टी आर केसवान, कुमार अंशुमान, यांच्यासह मोठ्या संख्येने मान्यवर पदाधिकारी हजर होते.

# लैंगिक अत्याचारातील पिढीतील न्याय मिळावा या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय येथे आमरण उपोषण

### आरोपीला तात्काळ अटक करू एमआयडीसी पोलिसांच्या पत्राने आमरण उपोषण आंदोलन स्थगित

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

लैंगिक अत्याचारातील पिडित महिलेला न्याय मिळावा. तसेच एमआयडीसी पोस्टे गुरनं. ४६९/२०२६ बी.एन.एस कलम ६४, ३५१(२) अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी नामे प्रविण ऊर्फ बबलु दत्तात्रय गुंड ( रा.शेंडी ता. जि. अहिल्यानगर) यास तात्काळ सदर गुन्हयात अटक करावी.या मागणीसाठी दि.१५/०८/२०२६ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गट महिला आघाडीच्या वतीने शहर जिल्हाध्यक्ष ज्योती फ्रान्सिस पवार यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषण करण्यात आले.

गेल्या दि. २५ जून २०२६ रोजी गुन्हा दाखल झाला असून आरोपीला अद्याप अटक करण्यात आलेले नाही पीडित आरोपी मुक्तपणे फिरत असल्याने पीडित महिला व कुटुंबाला त्रास सहन करावा लागत आहे आरोपीला अटक करावी व पीडित महिलेला न्याय मिळावा.आरोपीला तात्काळ अटक न केल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा आंदोलनास पाठिंबा देत ओबीसी व्हिजेएनटी जन मोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आला.

यावेळी बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड, सकल माळी समाजाचे अनिल इवळे,विनोद



पुंड,कॅप्टन सुधीर पुंड आदींसह विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

आरोपीला अटक करण्यात येईल.याबाबत चे पत्र एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी रिपब्लिकन पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष ज्योती पवार व ओबीसी व्हिजेएनटी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांना पत्र देऊन तसेच उपोषण करताना लिंबू सरबत देऊन हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे प्रविण ऊर्फ बबलु दत्तात्रय गुंड,रा.शेंडी ता. जि. अहिल्यानगर यास आम्ही दि.१८/०८/२०२६ रोजी पावेतो किंवा त्या अगोदर अटक करुन त्यास मा. न्यायालयासमोर हजर करण्याची तजविज ठेवली आहे. तसेच सदर आरोपीचे अटक पूर्व जामीन ना

# डोंगरदऱ्यातल्या सोंगाळवाडीच्या शाळेत निनादले इंग्रजी भाषणांचे सूर!

## स्वातंत्र्यदिन सोहळा उत्साहात साजरा !

अकोले (समर्थ गांवकरी)

सह्याद्रीच्या कुशीत, डोंगरदऱ्यात वसलेल्या सोंगाळवाडीच्या छोटेखानी शाळेसमोरच्या पटांगणात स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने उत्साहाचं एक वेगळंच चित्र पाहायला मिळालं. झेंड्याच्या खांबाच्या बाजूला काढलेली भव्य रांगोळी, शाळेचा लावलेला आकर्षक फलक आणि त्याला लावलेले रंगीबेरंगी फुगे, झेंड्याभोवती अर्ध्या विटा मातीत गाडून आखलेली रेखीव सजावट, केलेली रंगरंगोटी, चिमुकल्या हसऱ्या मुलींच्या पोषाखावर शोभून दिसणारी तिरंगी ओढणी... मुलांचे टापटीप आकर्षक रंगसंगतीमधले सुंदर पोशाख... या सगळ्यामुळे शाळेचा परिसर राष्ट्रीय सणाच्या निमित्ताने चैतन्याने अक्षरशः खुलून गेला होता. दुर्गम भागातल्या डोंगरदऱ्यात वसलेल्या सोंगाळवाडीच्या शाळेत इंग्रजी भाषणांचे सूर निनादले. ते ऐकून पालक आणि उपस्थित नागरिक अत्यंत प्रभावित झाले.

सुरुवातीला वस्तीतून काढलेली प्रभातफेरी उत्साहात पार पडली. मुलांनी संगीतबद्ध कवायत सादर केली. देशभक्तीपर गीतांवर सादर केलेली नृत्यं कार्यक्रमाची रंगत वाढवली. त्यात भर पडली ती चुणचुणीत मुलांनी अस्खलित इंग्रजीत केलेल्या भाषणांची. दुर्गम भागातील या छोट्याशा शाळेत मुलांचा हा आत्मविश्वास पाहून उपस्थित पालकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि अभिमानाची लहर स्पष्ट दिसत होती.

शाळेची स्थापना झाल्यानंतर पहिल्यांदाच मुलांनी इंग्रजीत भाषणे करुन लक्ष वेधून घेतले. यामुळे मुलांचे कौतुक झाले त्यांना शाबासकी मिळाली आणि शिक्षकांच्या कामाची प्रशंसा झाली. सोंगाळवाडीच्या शाळेची स्थापना झाल्यापासून स्वातंत्र्यदिनाचा एवढा




उत्साहात आणि धूमधडाक्यात कार्यक्रम पहिल्यांदाच झाल्याचं गावातील बुजुर्ग सांगत होते. कार्यक्रमाला शिवसेनेचे (शिंदे गट) नेते मारुती मेंगाळ उपस्थित होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य, तसेच वस्तीतील महिला–पुरुष राष्ट्रीय सण साजरा करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वांनी मुलांचं भरभरून कौतुक केलं. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रामदास सोंगाळ यावेळी उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक बाळू धिंदळे आणि समता कराळे यांनी विशेष मेहनत घेतली होती. खरं तर मोठ्या गावांतील शाळांसाठी स्वातंत्र्यदिन किंवा प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने संगीत कवायत, समूह नृत्य, विविध भाषांमध्ये केलेली भाषणं आणि सांस्कृतिक कार्यक्रम हा नेहमीचाच परिपाठ असतो. मात्र, अनुसूचित जमातीची लोकसंख्या लक्षणीय असलेल्या एका छोट्याशा वस्तीतील शाळेत असा उत्साह, असा आत्मविश्वास आणि असा देखणा माहोल निर्माण होणं ही निश्चितच कौतुकाची बाब होती.

# विषमते विरुद्धचा लढा आणि शिक्षणाची मशाल!

### मी वस्ताद लहुजी साळवे बोलतोय एकपात्री प्रयोगाचे यशस्वी आयोजन



पारनेर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात बहुजन, दलित आणि शोषित घटकांच्या उद्धारासाठी झटणाऱ्या महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. याच पार्श्वभूमीवर, सावित्री फातेमा सद्भावना मंचच्या वतीने प्रा. कुमार आहेर( सर)यांच्या माध्यमातून प्रेरणास्थान, मुक्ता साळवे हिच्या जीवनकार्यावर आधारित एका अत्यंत महत्त्वपूर्ण 'एकपात्री प्रयोगाचे' आयोजन करण्यात आले. हा प्रयोग केवळ मनोरंजनाचा नसून, समता, बंधुता आणि न्यायाचे विचार घराघरांपर्यंत पोहोचवणारा एक ऐतिहासिक टप्पा ठरला आहे.

इतिहासामध्ये मांग आणि महार समाजाला जो जातीय भेदभाव, अस्पृश्यता आणि अमानुष सामाजिक अन्याय सहन करावा लागला, त्याविरुद्ध निर्भिडपणे आवाज उठवणाऱ्या मोजक्या महान व्यक्तींमध्ये मुक्ता साळवे यांचे नाव अग्रक्रमाने येते. त्यांनी आपल्या अत्यंत प्रभावी लेखणीच्या माध्यमातून त्या काळातील प्रस्थापित विषमतेला आणि जातीव्यवस्थेला थेट आव्हान दिले. शिक्षणाचे दरवाजे वंचितांसाठी बंद असताना, शिक्षणालाच आपले हत्यार बनवून त्यांनी सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी केली. त्यांच्या याच प्रेरणादायी संघर्षाचे ज्वलंत आणि जिवंत चित्र प्रा. कुमार आहेर (सर) यांनी आपल्या प्रभावी एकपात्री सादरीकरणातून रसिकांसमोर उभे केले. प्रा. कुमार आहेर यांच्या ओघवत्या वाणीने आणि ताकदीच्या अभिनयाने उपस्थितांच्या अंगावर काटा आणला. नाटक आणि सादरीकरणाच्या माध्यमातून जेव्हा मुक्ता साळवे यांच्या वेदना, त्यांचा संघर्ष आणि त्यांची जिद्द मांडली गेली, तेव्हा उपस्थित प्रेक्षक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. या कलाकृतीमुळे बहुजन समाजात एक नवी चेतना निर्माण होत असून, आजच्या तरुणाईला त्यांच्या खऱ्या इतिहासाची ओळख होत आहे. विषमतेच्या अंधारात शिक्षणाची मशाल पेटवणाऱ्या मुक्ता साळवे यांचा हा प्रवास आजच्या तरुण पिढीला मोठी प्रेरणा देणारा ठरत आहे.

सद्भावना मंचने या उपक्रमाचे आयोजन करून समाजातील प्रबोधन अधिक तीव्र करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. अशा वैचारिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळेच खऱ्या अर्थाने महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे विचार घराघरांपर्यंत पोहोचत आहेत. सामाजिक जाणिवा समृद्ध करणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून मोठे कौतुक होत असून, भविष्यातही अशा प्रकारच्या प्रबोधनात्मक कार्यक्रमांची शहरात आणि ग्रामीण भागात नितांत आवश्यकता असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

हा प्रयोग म्हणजे केवळ एक कलाकृती नसून तो एका मोठ्या सामाजिक परिवर्तनाचा आणि क्रांतीचा पाया आहे, ज्यातून समतेचा नवा सूर्य नक्कीच उगवेल, असा विश्वास याप्रसंगी व्यक्त करण्यात आला.

# कळमजाई परिसर पर्यटकांचे आकर्षण केंद्र ठरेल : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

### कळमजाई मंदिर सुशोभीकरणासाठी आ. सत्यजित तांबे प्रयत्नातून २५ लाख रुपयांचा निधी गर्द हिरवाई ,रिमझिम पाऊस आणि महिलांच्या लेझीम पथकात स्वागत

संगमनेर (समर्थ गांवकरी)

संगमनेर तालुक्याला निसर्गाचे मोठे वरदान लाभले असून गर्द हिरवाईने नटलेले डोंगर, पावसाची रिमझिम आणि अशा रमणीय वातावरणात अत्यंत मोठ्या उत्साहाने आणि आनंदान महिला भगिनींनी लेझीम पथकात लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांचे केलेले स्वागत हे संस्मरणीय ठरले असून हा परिसर पर्यटकांसाठी मोठे आकर्षणाचे केंद्र ठरेल असा विश्वास महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला आहे.

कोठे बुद्रुक व खांडगेदरा परिसरात असलेल्या कळमजाई मंदिरासाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या प्रयत्नातून सुसोबी करण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. या अंतर्गत होणाऱ्या विविध कामांच्या शुभारंभ करण्यात आला यावेळी लोकनेते बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, युवा काँग्रेसचे उपाध्यक्ष अक्षय ढोकरे, शांताराम ढोकरे, दत्तात्रेय खांडगे, राजू ढोकरे, बबलू खांडगे, पोलीस पाटील दत्तू खांडगे, सुभाष ढोकरे, माधव ढोकरे ,प्रकाश खांडगे, संजय खांडगे, ओंकार ढोकरे, जालिंदर ढोकरे, सुधीर खांडगे, यांच्यासह विविध



पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### वांजुळशेत येथे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व शालेय साहित्य वाटप




अकोले (समर्थ गांवकरी)

वांजुळशेत (ता. अकोले) येथे जागतिक आदिवासीदिनानिमीत्त विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा व शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. आदिवासी क्रांती दलाच्यावतीने आयोजित गुणगौरव सोहळा व आदिवासी दिन या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बृहन्मुंबई महानगर पालीकेतील रचना व कार्यपद्धती अधिकारी देवराम पडवळे हे होते तर प्रथम क्रांतीकारक राघोजी भांगरे, क्रांतीवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता – दहावीत यश संपादन केलेल्या अक्षदा तुकाराम पडवळे (प्रथम), आश्वीनी भिमा वाळेकर (द्वितीय) , माया दिपक लोहकरे (तृतीय) , तसेच इयत्ता बारावीमध्ये चारुशीला अशोक लोहकरे (प्रथम), आरती चंद्रभान वाळेकर (द्वितीय), सोम नाथ निवृत्ती वाळेकर (तृतीय) तर शिष्यवृत्ती परिक्षेत सिध्देश नामदेव पडवळे, साहिल सुधाकर बर्वे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाफार्मत घेण्यात आलेल्या परिक्षेत उप जिल्हाधिकारी पदी निवड झालेल्या प्रिती बाजीराव वाळेकर या सर्व विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी गावातील सेवा निवृत्त कर्मचार्यांचाही सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद प्रशालेतील विद्यार्थांना ललीता दिपक डोळस (तांबेकर) तसेच मुंबईकर व ग्रामस्थांच्या वतीने शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले यावेळी कार्यक्रमास उपस्थित मान्यवर नवनाथ लहानगे यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले की, आदिवासी विद्यार्थांनी शिक्षणावर लक्ष केंद्रीत करून शैक्षणिक धोरण ठरविले पाहिजे. आपली संस्कृती, बोली भाषा जतन करण्याचे काम आपल्याला करायचे आहे कारण आदिवासींची भाषा, शब्द एआय ला देखिल माहित नाही ते फक्त आपणच सांगू शकतो. विद्यार्थांच्या शैक्षणिक धोरणांविषयी ग्रामस्थांनी देखिल जागरुकतेची भूमिका घेतली पाहिजे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय वाळेकर यांनी केले. कार्यक्रमास सुत्रसंचालन सुनिल मेचकर यांनी केले तर आभार नारायण कोडार यांनी मानले. कार्यक्रमास नामदेव लोहकरे, दुंदा पडवळे , काशिनाथ वाळेकर, खंडू इरनक, पुनाजी तांबेकर , दुंदा लोहकरे , पांडुरंग लोहकरे, गोविंदा लोहकरे, लहानु देठे , दगडु वाळेकर, राजेंद्र लोहकरे, रोहीदास शेंगाळ, रामनाथ लोहकरे, शांताराम पडवळे, विश्वनाथ लोहकरे, अरुण वाळेकर, भास्कर वाळेकर, गणेश चिखले, भरत लोहकरे, प्रकाश लोहकरे, दत्तात्रय वाळेकर, ऋषीकेश तांबेकर, तुकाराम कोंडार, ज्ञानेश्वर तांबेकर, आकाश पडवळे, ज्ञानेश्वर वाळेकर, सचिन पडवळे यासह ग्रामस्थांची कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### एमआयडीसी परिसरात दहशत, नगरमधून तीन सराईत गुन्हेगार वर्षभरासाठी हद्दपार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

शहरातील तोफखाना आणि एमआयडीसी परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या टोळीतील तीन सराईत गुन्हेगारांना तब्बल एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. या टोळीविरुद्ध बेकायदेशीर जमाव जमवणे, घातक हत्यारे बाळगणे, मालमत्तेचे नुकसान करणे आणि खुनाचा प्रयत्न यांसारखे तब्बल आठ गंभीर गुन्हे दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार सखोल चौकशीअंती आशिष ऊर्फ पप्पू अंतोन पाटोळे (२२, रा. नागापूर), अमोल गोरख आव्हाड (२४, रा. काकासाहेब म्हस्के रोड) आणि सुरज ऊर्फ खंडू अरविंद भिंगारदिवे (२२, रा. नागापूर) या तिघांविरोधात हद्दपारीची कारवाई करण्यात आली.

### दिल्लीतील पेट्रोल पंपावर सीएनजी सिलेंडरचा भीषण स्फोट

**३ कामगारांचा मृत्यू, ३ जण गंभीर जखमी**

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

नवी दिल्लीतील टिकरी कलान मेट्रो स्टेशनजवळील पेट्रोल पंपावर ट्रकच्या सीएनजी सिलेंडरमध्ये गॅस भरताना अचानक स्फोट झाल्याची भीषण घटना घडली. या दुर्घटनेत सीएनजी पंपावर काम करणाऱ्या तीन कामगारांचा मृत्यू झाला असून, तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रकच्या सीएनजी सिलेंडरमध्ये गॅस भरला जात असताना अचानक स्फोट झाला. या स्फोटात मनीष नावाच्या २५ वर्षीय कामगाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तो पश्चिम दिल्लीतील बाबा हरिदास कॉलनीचा रहिवासी होता. तर अन्य दोन जखमींचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## पर्यावरण संवर्धनासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा : वनरक्षक रमेश खरमाळे




राजूर (समर्थ गांवकरी)

पर्यावरणाचे संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी असून, युवकांनी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धन आणि वनसंरक्षणाचा ध्यास घ्यावा, असे आवाहन सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जुन्नर येथील वनरक्षक रमेश खरमाळे यांनी केले.

सत्यनिकेतन संचालित ड्. म नोहरराव नानासाहेब देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राजूर येथे विद्यार्थी कल्याण मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, ग्रीन क्लब व वनस्पतीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'पर्यावरण जागृती व वन संरक्षण' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खरमाळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बी. वाय. देशमुख होते. यावेळी साईयोग फाउंडेशन, राहाता येथील मोहन तांबे, महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व 'आम्ही पर्यावरण प्रेमी ग्रुप'चे संस्थापक अध्यक्ष राहुल राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती.

खरमाळे यांनी तापमानवाढ, अनियमित पाऊस, पाण्याची कमतरता, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यामुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय समस्यांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी आणि पक्षी हे पर्यावरणीय साखळीतील महत्त्वाचे घटक असून त्यांचे जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

'पर्यावरण सेवा हीच देशसेवा होय,' असा संदेश देत त्यांनी युवकांनी पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, तसेच मोबाईल व तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करावा, असे आवाहन केले.

वृक्षारोपणाबाबत बोलताना खरमाळे यांनी 'एक झाड लावणे ही सुरुवात आहे; त्या झाडाला जगवणे ही खरी पर्यावरण सेवा आहे,' असे सांगितले. केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या रोपांचे संगोपन व संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

राहुल राऊत यांनी पर्यावरण जनजागृती ही काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी पर्यावरणाबाबत केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती करावी, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. देशमुख यांनी प्लास्टिकचा वापर कमी करणे, पाण्याची बचत करणे, वृक्षांचे संरक्षण करणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. व्याख्यानानंतर महाविद्यालयाच्या प्रांगणात मान्यवर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी खरमाळे यांनी विद्यार्थ्यांना रोपांची निवड, लागवड, पाणी व्यवस्थापन व संगोपनाबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बी. टी. शेणकर, आभार डॉ. व्ही. एन. गीते यांनी मानले, तर सूत्रसंचालन कॅप्टन रोहित मुठे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी म हाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## भाजपच्या भटके-विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर तुषार पोटे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भारतीय जनता पार्टीच्या भटके-विमुक्त प्रकोष्ठाच्या राज्य समितीवर सहसंयोजकपदी अहिल्यानगरचे तुषार पोटे यांची निवड करण्यात आली आहे. राज्य समितीच्या अध्यक्षा नरेंद्र पवार यांनी त्यांच्या नियुक्तीची घोषणा केली. या निवडीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून पोटे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



तुषार पोटे गेल्या २५ वर्षांपासून भारतीय जनता पार्टीचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून कार्यरत आहेत.

पक्षाच्या विविध संघटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यभर पक्षविस्तारासाठी सातत्याने काम केले आहे. २००९ मध्ये भाजप युवा मोर्चाच्या कार्यकारिणी चिटणीसपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. त्यानंतर २०१३ मध्ये युवा मोर्चाचे सरचिटणीस, २०१६ मध्ये युवा मोर्चाचे प्रदेश कोषाध्यक्ष, तर २०२० मध्ये भाजप शहर जिल्हा सरचिटणीस म्हणून त्यांनी काम केले.

त्यानंतर २०२३ मध्ये भटके-विमुक्त मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. २०२६ मध्ये प्रदेश सरचिटणीस तथा सहसंयोजक म्हणून त्यांनी भटके-विमुक्त समाजाच्या विविध प्रश्नांसाठी आणि पक्ष संघटन म जबूत करण्यासाठी काम केले. आता राज्य समितीवर सहसंयोजक म्हणून झालेली निवड ही त्यांच्या प्रदीर्घ संघटनात्मक कार्याची दखल मानली जात आहे.

लोकसभा, विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका आणि विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी पोटे यांनी सातत्याने प्रयत्न केले. भटके-विमुक्त समाजातील कार्यकर्ते व नागरिकांशी संपर्क वाढवून त्यांना पक्षाच्या प्रवाहात आणण्यासाठीही त्यांनी संघटनात्मक पातळीवर काम केले आहे.

## लिंपणगावच्या सिद्धेश्वर मंदिरात पहिल्या श्रावणी सोमवारी भाविकांची मोठी गर्दी

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

श्रीगोंदा तालुक्यातील लिंपणगाव येथील ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज मंदिरात पहिल्या श्रावणी सोमवारनिमित्त भाविकांनी दर्शन व महाभिषेकासाठी मोठी गर्दी केली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची वर्दळ सुरू होती. महाभिषेक, पूजाअर्चा आणि दर्शनामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.

श्रावण महिना सुरु होताच लिंपणगाव येथील सिद्धेश्वर मंदिरात दररोज भाविकांची मोठी गर्दी होत आहे. श्रावण महिन्यात ग्रामस्थांच्या वतीने आठ दिवसांच्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. १८ ऑगस्टपासून या अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ झाला असून, दररोज सायंकाळी ८ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार व प्रवचनकारांची कीर्तने आणि प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत. सप्ताहाच्या कालावधीत कीर्तनसेवा पूर्ण झाल्यानंतर उपस्थित भाविकांसाठी ग्रामस्थांच्या वतीने दररोज अन्नदान करण्यात येत आहे. संपूर्ण श्रावण महिन्यात लिंपणगावमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण होते. पंढरीचे स्वरूप प्राप्त झालेल्या या गावात दूरवरून भाविक सिद्धेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी आवर्जून येतात. सिद्धेश्वर महाराजांचे मंदिर जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असून, काष्टी-श्रीगोंदा राष्ट्रीय महामार्गालगत असलेले हे पुरातन हेमाडपंथी मंदिर भाविकांचे श्रद्धास्थान आहे. नवसाला पावणारे देवस्थान अशी श्रद्धा असल्याने अनेक भाविक श्रावण महिन्यात आपले वर्षपूर्तीचे नवस पूर्ण करण्यासाठी येथे येतात.

## शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसान भरपाई मिळणार : ॲड. वसंतराव मनकर

राजूर (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रातील बहुतेक जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे, ,पिकाचे ,घरांचे, जनावरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जीवितहानी सुद्धा झाली आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभेच्या वतीने राज्याचे कृषिमंत्री माननीय नामदार दत्तामामा भरणे यांच्याकडे केली . यावेळी कृषिमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले की संपूर्ण नुकसानीचे प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्याचे काम पूर्ण होत आले आहे त्या सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निश्चितपणे नुकसान भरपाई मिळेल महाराष्ट्रातील एकही शेतकरी राज्य सरकार वाऱ्यावर सोडणार नाही. अशी स्पष्ट ग्वाही कृषिमंत्र्यांनी या भेटीच्या दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी किसान सभा अध्यक्ष ॲड वसंतराव मनकर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी विभागाचा PMEME योजनेत देशात प्रथम क्रमांक आला आहे. भारत सरकारच्या अन्न व प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीने दिनांक



२४ व २५ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे कृषिमंत्री यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील युती सरकार आणि विशेषत कृषी विभाग शेतकरी हिताचे अनेक चांगले निर्णय घेत आहे .विशेषतः शेतकऱ्यांची कर्जमाफी यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी निश्चितपणे समाधानी आहे.

## म्हैसवळण घाट मार्गे अकोले-कसारा एसटी बस पुन्हा सुरू

एकदरे (समर्थ गांवकरी)

अकोले तालुक्यातील म्हैसवळण घाट मार्गे धावणारी अकोले-कसारा एसटी बस सेवा गेल्या अनेक दिवसांपासून बंद होती.अखेर १७ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता अकोले येथून ही बस पुन्हा प्रवाशांच्या सेवेत दाखल झाली.बस सुरू झाल्यानंतर मार्गावरील विविध गावांमध्ये ग्रामस्थांकडून बसचे उत्साहात स्वागत करण्यात आले.चंदगिरवाडी येथे ग्रामस्थांनी बस कर्मचाऱ्यांना फेटा बांधून तसेच श्रीफळ फोडून बसचे पूजन केले.चंदगिरवाडीचे युवा उद्योजक नामदेव घोरपडे,ड. सिद्धेश्वर लांघी तसेच एकदरे-चंदगिरवाडी परिसरातील ग्रामस्थांच्या सहकार्याने अकोले आगाराचे आगारप्रमुख सुरेश दराडे यांची भेट घेऊन अकोले,देवठाण,केळी,सांगवी, खिरविरे,एकदरे म्हैसवळण घाट मार्गे कसारा एसटी बस सेवा सुरू करण्याबाबत निवेदन देण्यात आले होते.

या निवेदनाची तत्काळ दखल घेत आगारप्रमुखांनी १७ ऑगस्ट २०२६ पासून बस सेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार सोमवारी सकाळी ७ वाजता ही बस अकोल्याहून कसाऱ्याकडे मार्गस्थ झाली.बस सेवा पुन्हा सुरू झाल्याने परिसरातील नागरिकांना सुलभ,सुरक्षित आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध झाली असून प्रवाशांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.या बस सेवेमुळे परिसरातील दळणवळणाचा महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागणार असून मुंबईकडे नोकरी,व्यवसाय व इतर कामानिमित्त प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.बस



सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत असून याच मार्गावर आणखी एक बस सुरू करण्याचाही सकारात्मक विचार करण्यात येईल,असे आगारप्रमुख सुरेश दराडे यांनी सांगितले.परिसरातील नागरिकांनी या बस सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले.तसेच एकदरे चंदगिरवाडीच्या ग्रामस्थांनी श्रमदानातून पैशे काढून खड्डे मुक्त म्हैसवळण घाट करण्याचा निर्णय घेतला असून येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीवर बदल होणार आहे.

यावेळी ड.सिद्धेश्वर लांघी,नामदेव घोरपडे, चंदगिरवाडीचे सरपंच यशवंता बेंडकोळी,नामदेव साबळे,बाळू आव्हाड,कुंडलिक भांगरे,गोवा पाटील,नामदेव भांगरे तसेच परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## नगरमध्ये हुंडामुक्त विवाहसंस्कृतीचा एल्गार;जात, हुंडा, कर्ज अन् दिखाऊपणाला लग्नातून हद्दपार करण्याचा निर्धार!

### 'तिरंगा धारणालय विवाह'चा नवा संकल्प; जातमुक्त, हुंडामुक्त विवाहसंस्कृतीचा एल्गार

### २८ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संविधानाधिष्ठित विवाहव्यवस्थेची सार्वजनिक घोषणा

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जातव्यवस्था, हुंडापद्धती, अवाढव्य विवाहखर्च, विवाहासाठी घेतले जाणारे कर्ज, दिखाऊ प्रतिष्ठा आणि प्रदूषणकारी सोहळे विवाहसंस्थेतून हद्दपार करून समानता, विवेक, संविधानिक नैतिकता आणि उन्नत चेतनेवर आधारित 'तिरंगा धारणालय विवाह' व्यवस्था सुरू करण्याचा प्रस्ताव पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेने जाहीर केला आहे.

या नव्या संविधानाधिष्ठित विवाहसंकल्पनेची सार्वजनिक घोषणा शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विधिज्ञ ड. कारभारी गवळी यांनी दिली.

'तिरंगा धारणालय विवाह' हा स्वतंत्र विवाहकायदा किंवा कोणताही धार्मिक पंथ नसून, कायदेशीरदृष्ट्या पात्र असलेल्या दोन प्रौढ व्यक्तींनी स्वेच्छेने स्वीकारावयाची ऐच्छिक संविधानाधिष्ठित विवाह-सनद असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

विवाहाची कायदेशीर नोंदणी लागू कायद्यांनुसारच केली जाईल. मात्र, जीवनसाथीची निवड जन्माची जात, उपजात, हुंडा, संपत्ती किंवा सामाजिक प्रतिष्ठेच्या निकषांवर न करता व्यक्तीची वैचारिक पात्रता, परस्पर सन्मान, लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संविधानिक नैतिकता आणि कायद्याच्या राज्यावरील विश्वास या मूल्यांच्या आधारे व्हावी, हा या संकल्पनेचा मुख्य उद्देश आहे.

या विवाहव्यवस्थेत तिरंग्याच्या तीन रंगांना मूल्यात्मक अर्थ देण्यात आला आहे. भगवा रंग लोकभक्तीचा, पांढरा रंग ज्ञानभक्तीचा आणि हिरवा रंग कर्मभक्तीचा, तर अशोकचक्र संविधानिक नैतिकता आणि कायद्याच्या राज्याचे प्रतीक मानण्यात आले आहे. या मूल्यांवर आधारित सहजीवनातून पती-पत्नीमध्ये परस्पर विश्वास, समानता, सुरक्षितता आणि उन्नत आनंद निर्माण व्हावा, अशी संकल्पना मांडण्यात आली आहे.

जन्माची जात ही जीवनसाथीच्या निवडीची अट असू नये, अशी स्पष्ट भूमिका या प्रस्तावातून मांडण्यात आली आहे. जात, उपजात, वर्ण, हुंडा किंवा तथाकथित कौटुंबिक प्रतिष्ठेच्या नावाखाली कायदेशीर वय पूर्ण केलेल्या प्रौढ व्यक्तींच्या स्वेच्छेवर दबाव आणण्यास स्पष्ट विरोध करण्यात आला आहे. हुंडा देणे, घेणे अथवा त्याची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मागणी करणे पूर्णतः निषिद्ध मानण्याचा संकल्पही करण्यात आला आहे.

विवाहसमारंभात मोजके नातेवाईक आणि जवळचे मित्र यांनाच सहभागी करून भव्य मंडप, अवाजवी सजावट, महागड्या भेटवस्तू, भोजनातील उधळपट्टी आणि प्रतिष्ठेच्या प्रदर्शनावर होणारा खर्च टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विवाहामुळे कोणत्याही कुटुंबावर कर्जाचा बोजा पडू नये; उलट वाचविलेला पैसा नवदाम्पत्याचे शिक्षण, निवास, आरोग्य, व्यवसाय किंवा सुरक्षित भवितव्य यांसाठी वापरला जावा, अशी भूमिका या संकल्पनेत मांडण्यात आली आहे.

कायद्यानुसार पुनर्विवाहास पात्र असलेल्या घटस्फोटित व्यक्ती, विधवा आणि विधुर यांच्या विवाहाकडे सामाजिक कलंक म्हणून पाहिले जाऊ नये, असेही या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. पूर्वीच्या विवाहाची, अपत्यांची तसेच महत्त्वाच्या कौटुंबिक आणि आर्थिक जबाबदाऱ्यांची माहिती दोन्ही व्यक्तींनी एकमेकांना प्रामाणिकपणे द्यावी आणि परस्पर संमतीने व समान प्रतिष्ठेने विवाहाचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

विवाहसोहळ्याच्या नावाखाली होणारे ध्वनी आणि वायुप्रदूषण रोखण्यासाठी डीजे, कर्णकर्कश ध्वनिक्षेपक, बँड-बाजा, फटाके, प्रदूषणकारी मिरवणुका आणि अनावश्यक वाहनताफे टाळण्याचा संकल्प करण्यात आला आहे. प्लास्टिकचा वापर, अन्नाची नासाडी आणि पर्यावरणाला हानी पोहोचविणारा दिखावा टाळून विवाहसोहळा ध्वनिप्रदूषणमुक्त, वायुप्रदूषणमुक्त आणि निसर्गस्नेही करण्यावर भर दिला जाणार आहे.

पती-पत्नीच्या नात्यात लैंगिक समानता, व्यक्तिसन्मान, आर्थिक पारदर्शकता, घरकामातील समान सहभाग आणि परस्पर सुरक्षितता या बाबींना महत्त्व दिले जाणार आहे. मतभेद निर्माण झाल्यास हिंसा, अपमान, जातीय दबाव किंवा कौटुंबिक दहशतीऐवजी संवाद, समुपदेशन आणि कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याची भूमिका घेण्यात आली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त आज मोफत २० ऑगस्टला मेकअप प्रशिक्षण

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

येथील स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ व भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सवात बागडपट्टीत जिव्हेश्वर भवन येथे दिनांक २० ऑगस्ट ला दुपारी ४ वा सर्वासाठी खुला विनामूल्य मेकअप प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला आहे.

महिला व युवतीचा कल स्मार्ट दिसण्याकडे असतो त्यामध्ये आपले व्यक्तिमत्व मेकअप सुंदर व आकर्षक दिसण्यासाठी त्याचा प्रयत्न असतो आपण छान आवरलय पण काही तरी कमी वाटतयअसा विचार त्याच्या मनात येतो त्यासाठी प्रोफेशनल मेकअप स्वतःचा स्वःताच शिका तसेच स्किन व पर्सनालिटी प्रमाणे मेकअप, ड्रेपिंग,हेअर केअर याचे मार्गदर्शन व काही खास मेंजिक टिप्स देण्यात येणार आहे यामध्ये युवा मेकअप आर्टिस्ट नक्षत्रा कांबळे या प्रशिक्षण देणार आहे.

या मोफत प्रशिक्षण वर्गाचा जास्तीत जास्त युवती व महिलांनी लाभ घ्यावा व उपस्थित राहावे असे आवाहन स्वकुळसाळी हितसंवर्धक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्थेची १०३ वी वार्षिक सभा संपन्न !



नारायणगाव (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील १०३ वर्षांची यशस्वी परंपरा लाभलेल्या जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेस आर्थिक वर्ष २०२५/२६ मध्ये ३ कोटी ७८ लक्ष १० हजार रुपये इतका उच्चांकी नफा झाल्याची माहिती संस्थेचे सभापती सचिन मुळे यांनी दिली.

पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नारायणगाव ता.जुन्नर येथे निलायम गार्डन मंगल कार्यालयात संपन्न झाली.या सभेमध्ये संस्था व सभासद हिताचे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.सर्वसाधारण कर्ज मर्यादा ४० लक्ष रुपये,सभासद मृत्यू मदत निधी ३५ लक्ष रुपये,आकस्मिक कर्ज १ लक्ष रुपये,वैद्यकीय मदत निधी ७५ हजार रुपये यासारखे ठराव मंजूर करण्यात आले. संस्था स्वभांडवलावर व्यवसाय करत असून ८.६० % दराने कर्ज वाटप करत असून ८.४०% दराने मुदत ठेवी स्वीकारत आहे.संस्थेचे वसूल भाग भांडवल ४० कोटी रुपये असून सभासद संख्या १०८२ आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पहिल्या सत्रात केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक पदी पदोन्नती झालेल्या शिक्षकांचा तसेच शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शक शिक्षक,इस्रो-नासासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक शिक्षक,विविध पुरस्कार मिळवणाऱ्या शिक्षकांचा,विविध पुरस्कार प्राप्त शाळांचा तसेच सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी जि.प.सदस्य गुलाब पारखे,माई लांडे,पंचायत समिती सभापती कमल शेळकंदे,उपसभापती अमित ढोले,शिवसेना तालुकाप्रमुख बाबु पाटे, पं.स.सदस्य संभाजी चव्हाण,जयश्री बनकर,सुषमा वाव्हळ, संजय व-हाडी,जुन्नर शहर नगराध्यक्षा सुजाता काजळे,मधुकर काजळे,शिक्षक संघटनांचे पदाधिकारी राज्य संपर्कप्रमुख मंगेश मेहेर,जिल्हा सरचिटणीस खंडेराव ढोबळे,विकास मटाले,भरत बोचरे,रामदास संभेराव,तालुका अध्यक्ष वैभव सदाकाळ,रमाकांत कवडे,उपेंद्र डुंबरे,सत्यवान मस्के,सुभाष मोहरे,बाळासाहेब लांघी, चंद्रकांत डोके,मधुकर आढारी, राजेश दुरगुडे,मोहन नाडेकर, रविंद्र डुंबरे,रियाज मोमीन, शांताराम डोंगरे,प्रविण घोलप,कमलाकांत मुंढे,वैशाली कुऱ्हाडे,राजश्री डोंगरे,नयना आर्वीकर,सुरेखा बटवाल,पूनम जाधव आदि मान्यवर पदाधिकारी व सभासद शिक्षक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पिंपळवंडीत १० वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून हत्या; ग्रामस्थांचा रास्ता रोको आंदोलन



आळेफाटा (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे मंगळवारी दि. १८ रोजी १० वर्षीय चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, घरात एकटी असलेली चिमुकली घरात नसल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी शोध सुरू केला. यावेळी गावातीलच २५ वर्षीय साहिल संपत खैरे याने चिमुकलीला उसाच्या शेतात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आणि नंतर तिची हत्या केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

कुटुंबीयांच्या तक्रारीनंतर आळेफाटा पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. उसाच्या शेतातून चिमुकलीचा मृतदेह ताब्यात घेऊन आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा पोक्सो कायद्यांतर्गत नोंदवण्यात आला आहे.

# दापोलीत महिला बचत गटाच्या ९ लाख ६० हजारांचा अपहार; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

रत्नागिरी (समर्थ गांवकरी)

विश्वासाने वापरण्यासाठी घेतलेले सोन्याचे दागिने बँकेत परस्पर गहाण ठेवणे आणि महिला बचत गटातील सदस्यांकडून कर्जाच्या हप्त्यांपोटी जमा केलेली लाखो रुपयांची रक्कम बँकेत न भरता हडप केल्याचा गंभीर प्रकार दापोली तालुक्यातील गिम्हवणे - सुतारवाडी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एकूण ९ लाख ६० हजार रुपयांचा अपहार केल्याच्या आरोपावरून दोघांविरुद्ध दापोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गिम्हवणे - सुतारवाडी येथील रहिवासी पूर्वा गणेश देवघरकर यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून प्रतिज्ञा विश्वास देवघरकर आणि विश्वास रमेश देवघरकर यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. संशयित प्रतिज्ञा देवघरकर आणि विश्वास देवघरकर यांनी फिर्यादी पूर्वा देवघरकर यांच्याकडून विश्वासाने परिधान करण्यासाठी घेतलेले सुमारे सहा तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र परस्पर बँकेत गहाण ठेवले आणि त्यातून मिळालेली रक्कम स्वतःच्या फायद्यासाठी वापरली.

याशिवाय, फिर्यादी यांच्या भावकीतील अनुष्का उमेश देवघरकर यांच्या मालकीची सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची कर्णफुलेही प्रतिज्ञा देवघरकर हिने वापरण्यासाठी नेऊन परस्पर बँकेत गहाण ठेवत रकमेचा अपहार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

प्रतिज्ञा देवघरकर हिच्याकडे विश्वकर्मा समूह महिला मंडळ बचत गटाच्या सचिवपदाची जबाबदारी होती. त्यामुळे बचत गटातील महिलांच्या कर्जाचे हप्ते गोळा करून ते वेळेत बँकेत भरण्याचे काम ती पाहत होती. मात्र, या विश्वासाचा गैरफायदा घेत तिने फिर्यादीसह बचत गटातील १२ महिला सदस्यांकडून गोळा केलेले सुमारे ४ लाख ६० हजार रुपये बँकेत जमा न करता स्वतःसाठी वापरले. तसेच एचडीएफसी बँकेमार्फत बचत गटाला मिळालेल्या सुमारे १० लाख रुपयांच्या कर्जाच्या परतफेडीसाठी सदस्यांनी जमा केलेले आणखी ५ लाख रुपयेही बँकेत न भरता परस्पर लाटले.



अशा प्रकारे सोन्याचे दागिने परस्पर गहाण ठेवणे आणि बचत गटाच्या सदस्यांच्या कर्जाचे हप्ते न भरता एकूण ९ लाख ६० हजार रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी भारतीय संहितेनुसार संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संपूर्ण आर्थिक फसवणूक प्रकरणाचा पुढील तपास दापोली पोलीस करत आहेत.

# जुन्नरमध्ये घडलेली घटना अतिशय संतापजनक: दोषींना फाशीची शिक्षा व्हावी : बाळासाहेब थोरात

संगमनेर (समर्थ गांवकरी)

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे साडेनऊ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याची घटना अत्यंत संतापजनक, दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणारी असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

याविषयी पुढे बोलताना ते म्हणाले की, माणुसकीला काळिमा फासणारी जुन्नर येथील घटना आहे. या अमानुष कृत्याचा तीव्र निषेध करतो. या घटनेची सखोल, निष्पक्ष आणि जलद चौकशी करून दोषी नराधमावर कठोरात कठोर कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाची फास्टट्रॅक कोर्टात सुनावणी करून चिमुकलीला लवकरात लवकर न्याय मिळाला पाहिजे.

अशा अमानुष घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदे आणि त्यांची प्रभावी व तत्पर अंमलबजावणी ही काळाची गरज आहे. समाजातील प्रत्येक मुलगी आणि महिला सुरक्षित राहील, यासाठी शासन आणि प्रशासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत असेही ते यावेळी म्हणाले.

जुन्नर घटनेतील दोषींना कठोर शिक्षा व्हावी - सत्यजित तांबे

जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी गावात एका १० वर्षांच्या चिमुकलीवर एका नराधमाने अत्याचार करून तिची हत्या केल्याची घटना मन सुन्न करणारी आहे. आपल्या समाजात इतक्या राक्षसी प्रवृत्तीचे नराधम वावरत आहेत, आपल्या मुलींवर सातत्याने अत्याचारांची टांगती तलवार आहे. ही बाब मला केवळ लोकप्रतिनिधी म्हणून नव्हे, तर एक माणूस म्हणून धक्का देणारी आहे.

पिंपळवंडीतील त्या नराधमाच्या अत्याचारांना बळी पडलेल्या चिमुकलीने किती यातना भोगल्या असतील, तिचे आई-वडील आता कोणत्या परिस्थितीतून जात असतील याची कल्पनाही करवत नाही. अशा अमानुष प्रकारांना आळा घालण्यासाठी त्या नराधमास कठोर शिक्षा व्हावी, अशी शासनाकडे आग्रहाची मागणी आहे. असे आ. सत्यजित तांबे यांनी म्हटले आहे

जुन्नर मधील घटना ही मानवतेला काळीमा फासणारी- डॉ जयश्रीताई थोरात

जुन्नर तालुक्यामध्ये लहानग्या चिमुकलीवर नराधमाने केलेल्या अत्याचाराची घटना ही अत्यंत क्रूर आणि निंदनीय आहे. महाराष्ट्र व केंद्र सरकारने याबाबत अत्यंत कठोर कायदा करण्याची गरज असून जेणेकरून यापुढे असे कृत्य करताना नराधमांना मोठा धाक निर्माण होईल. या घटनेतील आरोपीला तातडीने कठोर फाशीची शिक्षा व्हावी अशी मागणी करताना झालेली घटना ही मानवतेला काळीमा फासणारी असल्याचे युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्रीताई थोरात यांनी म्हटलं आहे.

# श्री संताजी नागरी पतसंस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

## अहिल्यानगरात संस्थेची प्रतिमा उंचावेल असे काम सुरू - चेअरमन हरिभाऊ डोळसे

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

तेली समाज पंचवाडा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृहात श्री संताजी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. ची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन हरिभाऊ डोळसे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यावेळी संचालक मंडळासह मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.




सभेच्या सुरुवातीला संत श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अहवाल वर्षात दिवंगत झालेल्या सभासदांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

संस्थेची वाटचाल संताजी महाराजांच्या विचारांनी - हरिभाऊ डोळसे

सभेला मार्गदर्शन करताना चेअरमन हरिभाऊ डोळसे म्हणाले, श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या विचारांनी पतसंस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेने सभासदांच्या हितासाठी वेळोवेळी योग्य निर्णय घेतले आहेत.

गेल्या काही वर्षात संस्था थांबल्यासारखी होती. परंतु आता आम्ही फक्त आणि फक्त जुनी थकित कर्जे वसूल करण्यावर भर दिला आहे. नवीन ठेवी किंवा बचत ठेवी सध्या घेतल्या जात नाहीत.

# क्वांटम कॉम्प्युटिंग संगणकीय तंत्रज्ञानाची पुढील पिढी या विषयावर तांत्रिक व्याख्यान संपन्न



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

नगर- कल्याण रोडवरील अभियंता भवन येथे अहिल्या नगर द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरच्या वतीने 'क्वांटम कॉम्प्युटिंग संगणकाच्या पुढील पिढीला समजून घेणे' या विषयावर डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील कॉम्प्युटर सायन्स अँड डिझाईन इंजिनिअरिंग विभागाच्या सहाय्यक प्रा.सौ. पूजा वैकर (चखए ) यांनी तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानातून त्यांनी क्वांटम कम्प्युटिंगची मूलभूत संकल्पना, क्वांटम बिट (क्विबिट), अध्यारोपण स्थिती, क्वांटम परस्परसंबंधी जोडणी, पारंपरिक संगणक आणि क्वांटम संगणक यांमधील फरक सांगून भविष्यातील संगणकीय तंत्रज्ञानातील क्वांटम कम्प्युटिंगचे महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. क्वांटम कम्प्युटिंगमुळे संगणकीय क्षेत्रात होणारे संभाव्य बदल आणि त्याच्या विविध क्षेत्रांतील उपयोगांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

कार्यक्रमास द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स लोकल सेंटरचे मानद सचिव डॉ.दीपक विधाते, अध्यक्ष भारतभूषण भागवत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्री. सौरभ वैकर, इंजि. आर.पी. वायकर, इंजि. हरीश ठिगळे, इंजि. अरविंद पारगावकर, इंजि. मनोहर आणेकर, इंजि. प्रदीप तांदळे, अभियंते, प्राध्यापक, विद्यार्थी आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उपस्थितांनी व्याख्यानाचा लाभ घेतला. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि आधुनिक संगणकीय तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावाच्या पार्श्वभूमीवर क्वांटम कॉम्प्युटिंग सारख्या अत्याधुनिक विषयावर आयोजित करण्यात आलेले हे व्याख्यान विद्यार्थी व तंत्रज्ञान क्षेत्रातील अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त ठरले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजना उपस्थितांनी अभिनंदन केले.

# सोबलेवाडीतील श्री महादेव मंदिर सभामंडपाचे भूमिपूजन उत्साहात

## सुनिताताई सोबले यांच्या शुभहस्ते भूमिपूजन; ग्रामस्थ व भाविकांची उपस्थिती

पारनेर (समर्थ गांवकरी)



सोबलेवाडी आणि पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खडीविहिर येथील श्री महादेव मंदिर परिसरात नवीन सभामंडपाच्या बांधकाम चा शुभारंभ मोठ्या उत्साहात करण्यात आला. सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांच्या शुभहस्ते सभामंडपाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ, भाविक आणि मंदिर देवस्थानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवीन सभामंडपामुळे मंदिरातील धार्मिक कार्यक्रमांसह भजन, कीर्तन, प्रवचन, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच ग्रामस्थांच्या सामाजिक उपक्रमांसाठी हक्काची व प्रशस्त जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या सभामंडपाच्या बांधकामाबद्दल ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी मंदिराचे पुजारी अक्षय गोसावी, विशाल सोबले, प्रवीण सोबले, अंकुश सोबले, मच्छिंद्र बोरुडे, मच्छिंद्र शेळके, नारायण म्हस्के, शिवाजी सोबले, बबन कावरे, किसन शेरकर, बाळासाहेब शेरकर, भाऊ शेरकर, दादा सोबले, तुकाराम शेरकर, जयश्री शेरकर, उषा बोरुडे, चैतन्य सोनवणे आदी ग्रामस्थ व भाविक उपस्थित होते.

श्री महादेव मंदिर परिसरात सभामंडपाची आवश्यकता अनेक दिवसांपासून जाणवत होती. धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता नवीन सभामंडपामुळे मोठी सोय होणार आहे. या उपक्रमासाठी ग्रामस्थ व देवस्थानच्या वतीने सहकार्य करण्यात येत असून, सभामंडपाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मंदिर परिसराच्या विकासाला आणखी चालना मिळणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित भाविकांनी श्री महादेवाचे दर्शन घेतले. ग्रामस्थ व मंदिर देवस्थानच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# दिल्लीगेट पटांगण येथे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त नेत्र तपासणी व संधिवात शिबिर संपन्न

## शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध केल्याने अनेकांचे जीवन सुखकर : विक्रम पाठक

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दिल्लीगेट पटांगण येथे मोफत नेत्र तपासणी आणि संधिवात शिबिराचे आयोजन करण्यात आले.

धावपळीच्या जीवनात आरोग्याकडे दुर्लक्ष होते. तसेच अचानक उद्भवणाऱ्या आरोग्य समस्यांसाठी होणारा औषधोपचाराचा खर्च परवडत नसल्याने अनेकजण उपचाराकडे दुर्लक्ष करतात. अशा परिस्थितीत या शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी उपलब्ध करून दिल्याने अनेक रुग्णांना मोठा लाभ झाला.

शिबिराच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्याने अनेकांचे जीवन सुखकर होत आहे, असे प्रतिपादन स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले.

उद्घाटन आणि सुविधा

भगवान जिव्हेश्वर मंदिर, दिल्लीगेट पटांगण, अहिल्यानगर आणि स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात आले.

शिबिरात मोफत संधिवात तपासणी, नेत्र तपासणी तसेच अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तगट आणि उइउ तपासणीची सुविधा देण्यात आली.

सुरुवातीला श्री जिव्हेश्वर भगवान यांचे पूजन करण्यात आले.यानंतर शिबिराचे उद्घाटन नेत्रतज्ञ डॉ. आदित्य खडामकर आणि संधिवात व सांधेरोग तज्ज्ञ डॉ. अदिती पाटणकर-देशपांडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



याप्रसंगी विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, विश्वस्त संजय सागावकर, खजिनदार गजेंद्र सोनवणे,सचिव विजय मानकर,उत्सव समितीचे प्रमुख नीरज चांगटे,राजेंद्र गर्जे,बबन शेख,मुकुंद सावेकर,अंबादास बडे, स्वकुळ साळी महिला मंचच्या अध्यक्ष छाया साळी, वनिता पाटेकर, वनिता मानकर, विद्या मानकर, मनीषा खडामकर, सायली खडामकर यांच्यासह मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.

गरजूंची सेवा हाच उद्देश

विश्वस्त संजय सागावकर म्हणाले, दरवर्षी भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. शिबिराच्या माध्यमातून गरजू रुग्णांना सेवा देणे हाच आमचा मुख्य उद्देश आहे. या शिबिराला समाजातून दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बबन शेख यांनी केले तर आभार सचिव विजय मानकर यांनी मानले.